# प्रकरण पाचवे

## माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन.

५.०१ प्रास्ताविक.

५.०२ प्रतिसादक मुख्याध्यापकांची माहिती.

५.०३ माध्यमिक शाळांविषयी सर्वसाधारण माहिती.

५.०४ कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर.

५.०५ माध्यमिक शाळांतील शिक्षकांविषयी माहिती.

५.०६ विद्यार्थ्यांविषयी माहिती.

५.०७ भौतिक सुविधा व शालेय परिसर.

५.०८ शालेय प्रशासनाच्या बाबतीत मुख्याध्यापकांनी दिलेली इतर माहिती.

५.०९ शिक्षण विस्ताराधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती.

५.१० गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखतीतून मिळलेली माहिती.

५.११ उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखतीतून मिळालेली माहिती.

५.१२ शिक्षणाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती.

५.१३ माध्यमिक शाळांना दिलेल्या भेटी व निरीक्षणातून मिळालेल्या माहितीचे विशदीकरण.

५.१४ समारोप.

# प्रकरण पाचवे

## माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन.

जिल्ह्यातील माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक, विस्ताराधिकारी व शिक्षणाधिकारी याना दिलेल्या प्रश्नावल्या आणि गटशिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकारी यांच्या घेतलेल्या मुलाखती व निवडक माध्यमिक शाळांना भेटी देऊन शाळांची केलेली निरीक्षणे खालील भागात कोष्टक रूपाने दिली आहेत.

**५.०१ प्रास्ताविक.**

यापूर्वीच्या चार प्रकरणात संशोधकाने माध्यमिक शिक्षणाच्या तात्विक भागाचा विचार केलेला आहे. चौथ्या प्रकरणात संशोधनाची पार्श्वभूमी विशद केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्याचे उद्दिष्ट आहे.

माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनात मुख्याध्यापक हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे हे संशोधकाच्या लक्षात आल्यानंतर संशोधकाने माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची संशोधनासाठी निवड केली. मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली तयार केली. मुख्याध्यापकांसाठी तयार केलेली प्रश्नावली परिशिष्ट 'अ' मध्ये देण्यात आली आहे. संशोधनाच्या कार्यक्षेत्रात एकूण ४७४ माध्यमिक शाळा आहेत. संशोधकाने त्यातील ५० टक्के शाळांची लॉटरी पध्दतीने संशोधन कार्यासाठी निवड केली. अशा निवड केलेल्या एकूण २३७ शाळापैकी २०० मुख्याध्यापकांनी प्रतिसाद दिला. प्रतिसादक मुख्याध्यापकांची यादी परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आली आहे.

त्याचबरोबर माध्यमिक शिक्षणातील इतर महत्त्वाचे प्रशासक म्हणून शिक्षण विस्ताराधिकारी, गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी यांची संशोधन कार्यासाठी निवड केली.

मुख्याध्यापकाबरोबर विस्ताराधिकारी व शिक्षणाधिकारी यांचेसाठी प्रश्नावली तयार केली. विस्ताराधिकाऱ्यांसाठीची प्रश्नावली परिशिष्ट "क" मध्ये देण्यात आली आहे. शिक्षणाधिकाऱ्यासाठीची प्रश्नावली परिशिष्ट "फ" मध्ये देण्यात आली आहे. संशोधानास आवश्यक असणारी संपूर्ण माहिती प्रश्नावलीद्वारे प्राप्त होऊ शकत नाही म्हणून संशोधकाने उपशिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखती घेण्याचे

ठरविले. त्यांच्यासाठी माध्यमिक शाळांचे प्रशासन याविषयावर मुलाखत सूची तयार केली व प्रत्यक्ष भेटीतून, चर्चेतून मुलाखतीद्वारे संशोधनास आवश्यक असणारी माहिती प्राप्त केली. गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीची प्रश्नसूची परिशिष्ट "ड" मध्ये देण्यात आली आहे. तर उपशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीची प्रश्नसूची परिशिष्ट "ई" मध्ये देण्यात आली. प्रतिसादक शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, विस्ताराधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांची यादी परिशिष्ट "ग" मध्ये देण्यात आली आहे.

संशोधकाने लातूर जिल्ह्यातील २५ माध्यमिक शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या व शाळांचे निरीक्षण केले. निरीक्षणातून संशोधन कार्यासाठी आवश्यक असणारी माहिती मिळविली. भेटी दिलेल्या शाळांची यादी परिशिष्ट "ह" मध्ये देण्यात आली आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावली व मुलाखत या साधनांचा अवलंब करून संबंधितांकडून संशोधकाने संशोधन कार्यासाठी आवश्यक असलेली माहिती मिळविली. मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व विषदीकरण पुढील प्रमाणे करण्यात आले आहे.


**५.०२ - प्रतिसादक मुख्याध्यापकांची माहिती.**

मुख्याध्यापकांसाठी तयार करण्यात आलेल्या प्रश्नावलीच्या पहिल्या भागात मुख्याध्यापकांविषयी वैयक्तिक माहिती संदर्भात प्रश्न विचारले होते. (प्रश्न क्र. १) मुख्याध्यापकाचे पूर्ण नाव, (प्रश्न क्र.२) शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, (प्रश्न क्र.३) मुख्याध्यापक पदभार - प्रभारी/कायम व (प्रश्न क्र.४) नोकरीचा एकूण अनुभव, अ) शिक्षक म्हणून ब) मुख्याध्यापक म्हणून.

प्रश्नावलीतील उपरोक्त प्रश्नाच्या आधारे प्राप्त झालेली माहिती येथे दिलेली आहे. हे प्रश्न प्रतिसादक मुख्याध्यापकांची व्यक्तिगत माहिती दर्शवितात. लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांतील प्रतिसादक मुख्याध्यापकांची यादी परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेली आहे.

खालील कोष्टक क्रमांक ५.०१ मध्ये माध्यमिक शाळांतील मुख्यांध्यापकाकडून भरून आलेल्या प्रश्नावलीच्या आधारे मुख्याध्यापकांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता दर्शविलेली आहे.

## १. मुख्याध्यापकांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता दर्शविणारा आलेख.



## कोष्टक क्र. ५.०१

## मुख्याध्यापकांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता.


| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | बी.ए. बी.एड्. | ९५ | ४७.५० |
| २. | एम.ए. बी. एड्. | १८ | ०९.०० |
| ३. | बी.एस्सी. बी. एड्. | ६५ | ३२.५० |
| ४. | एम. एस्सी. बी. एड्. | ०४ | ०२.०० |
| ५. | एम. एड्. | ०६ | ०३.०० |
| ६. | बी. पी. एड्. | १२ | ०६.०० |
| ७. | व्यावसायिक अप्रशिक्षित | ०० | ००.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

उपरोक्त कोष्टक क्रमांक ५.०१ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांच्या शैक्षणिक पात्रतेत बी.ए., बी.एड्. असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण ४७.५० % आहे. हे प्रमाण सर्वाधिक आहे. एम्.ए.,बी. एड्. शैक्षणिक पात्रता असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण ०९ % आहे. बी.एस्सी.,बी.एड्. शैक्षणिक पात्रता असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण ३२.५० % आहे. एम्. एस्सी., बी. एड्. शैक्षणिक पात्रता असणाऱ्या मुख्याध्यपकांचे प्रमाण ०२ % आहे. एम्.एड्.,उत्तीर्ण असलेल्या मुख्याध्यापकांचे प्रमाण ०३ % आहे. बी.पी.एड्. ही व्यावसायिक पात्रता असणाऱ्या मुख्यापकांचे प्रमाणे ०६ % आहे तर व्यावसायिक अप्रशिक्षित एकही मुख्याध्यापक नाही.

वरील माहितीवरून संशोधकास असे वाटते की मुख्याध्यापकांची शैक्षणिक पात्रता ही किमान पदव्युत्तर पदवी व बी. एड्. अशी असणे आवश्यक आहे. कारण अनके माध्यमिक शाळांना उच्च माध्यमिकचे वर्ग जोडलेले आहेत. त्यामुळे मुख्याध्यानक हे त्या वर्गांचे देखील प्रशासकीय प्रमुख असतात. अशा वर्गांना शिकविणाऱ्या अध्यापकांएवढी किमान शैक्षणिक अर्हता मुख्याध्यापकांची असणे आवश्यक आहे. त्याशिवाय मुख्याध्यापक उत्तम प्रशासन व मार्गदर्शन करू शकणार नाही.

वरील कोष्टाकातील माहिती वरून असे स्पष्ट होते की, मुख्याध्यापकांच्या

२. मुख्याध्यापकांचे पद (प्रभारी/कायम) दर्शविणारा आलेख.



शैक्षणणिक व व्यावसायिक पात्रतेत विविधता आहे. सर्वाधिक मुख्याध्यापकांचे प्रमाण हे कला शाखेचे पदवीधर व बी.एड् असणारांचे आहे. ही बाब समाधानकारक आहे. कारण माध्यमिक स्तरावर कला शाखेशी निगडीत विषयांची संख्या अधिक आहे.

मुख्याध्यापकांची शैक्षणिक पात्रता ही उच्चप्रतीची असावी असे संशोधकास वाटते. अशी पात्रता धारण केल्यास मुख्याध्यापक उत्तम प्रशासन करू शकतील व आपल्या सहकाऱ्यास आदर्श मार्गदर्शन करू शकतील. यामुळे शाळेचा दर्जा उंचावेल. विद्यर्थ्यांच्या प्रगीतबरोबर शैक्षणिक प्रगती साधता येईल.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ३ मुख्याध्यापक पदाविषयी विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून मिळालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.०२ मध्ये देण्यात आली आहे.


**कोष्टक क्र. ५.०२**

**मुख्याध्यापकांच्या पदाविषयी.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | प्रभारी | १७ | ०८.५० |
| २. | कायम | १८३ | ९१.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

उपरोक्त कोष्टक क्रमांक ५.०२ निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांचे प्रशासन पाहणाऱ्या मुख्याध्यापकांचे पद कायम असणाऱ्यांचे प्रमाण ९१.५० % आहे. ०८.५० % मुख्याध्यापक प्रभारी मुख्याध्यापक म्हणून शाळांचे प्रशासन चालवितात. कायम मुख्याध्यापकांचे शेकडा प्रमाण पाहिल्यास संशोधकास ते समाधानकारक वाटते. माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक जर प्रभारी असतील तर दैनंदिन कामकाज ते मन लावून करणार नाहीत. त्याचबरोबर मुख्याध्यापक पदाचा कार्यभार ते जबाबदारीने स्वीकारणार नाहीत. सहाजिकच शाळांचा दर्जा व गुणवत्ता यांच्या बाबतीत प्रभारी मुख्याध्यापकांचे दुर्लक्ष होईल. माध्यमिक शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी कायम मुख्याध्यापकांची आवश्यकता आहे. अशा कायम मुख्याध्यापकांची संख्या लातूर जिल्ह्यात समाधानकारक असल्याचे संशोधकास वाटते. अशा मुख्याध्यापकांसच पदाविषयी आस्था असेल. त्याचबरोबर असे मुख्याध्यापक

## ३.मुख्याध्यापकांचा प्रशासन अनुभव दर्शविणारा आलेख.



आपले कर्तव्ये व अधिकार यांचा विचार करतील. अन्यथा प्रभारी मुख्याध्यापक फक्त आपला कार्यकाल पूर्ण करतील. त्यांच्याकडून कोणत्याही शैक्षणिक प्रगतीची अपेक्षा करणे उचीत ठरणार नाही.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४ हा मुख्याध्यापकांच्या पदाच्या अनुभवाबाबत विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून मिळालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.०३ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्र. ५.०३**


**मुख्याध्यापकांचा प्रशासन अनुभव.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रनाण |
|---|---|---|---|
| | (अनुभव वर्ष) | | |
| १. | ०३ वर्षापेक्षा कमी | ४१ | २०.५० |
| २. | ०५ वर्षापेक्षा कमी | २४ | १२.०० |
| ३. | ०८ वर्षापेक्षा कमी | ७२ | ३६.०० |
| ४. | ०८ वर्षापेक्षा जास्त | ६३ | ३१.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.०३ निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांच्या प्रशासनात ३ वर्षापेक्षा कमी अनुभव असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण २०.५० % आहे. तसेच ५ वर्षापेक्षा कमी अनुभव असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण १२.०० % आहे. ८ वर्षापेक्षा कमी अनुभव असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण ३६.०० % आहे आणि ८ वर्षापेक्षा जास्त अनुभव असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण ३१.५० % आहे. यावरून असे स्पष्ट होते की ५ वर्षापेक्षा कमी मुख्याध्यापक पदाचा अनुभव असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण कमी आहे. परंतु ८ वर्ष व त्यापेक्षा अधिक अनुभव असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण समाधानकारक आहे. कारण मुख्याध्यापकाला प्रशासनातील अनुभव अधिक असेल तर मुख्याध्यापक उत्तम प्रशासक म्हणून कार्य करू शकेल.

उत्तम प्रशासकास अनुभवाची नितांत गरज असते. कोणताही व्यक्ती अनुभवातूनच कार्यकुशल होतो. अनुभवाशिवाय केवळ पुस्तकी ज्ञानाने व्यक्तीस पूर्णत्व प्राप्त होवू शकत नाही.

४. माध्यमिक शाळांचे ठिकाण दर्शविणारा आलेख.



## ५.०३ - माध्यमिक शाळांविषयी सर्वसाधारण माहिती.

मुख्याध्यापकांच्या प्रश्नावलीच्या दुसऱ्या भागात माध्यमिक शाळांविषयी सर्वसाधारण माहिती मिळविण्यासाठी प्रश्न विचारण्यात आले होते. प्रश्न क्र.५ मध्ये माध्यमिक शाळेचे संपूर्ण नाव, शाळेचे ठिकाण या बाबात माहिती विचारली होती. प्रश्न क्र. ६ मध्ये शाळेचे स्थापना वर्ष विचारण्यात आले. प्रश्न क्र. ७ मध्ये शाळेचा प्रकार, मुलांची, मुलींची व मुला-मुलींची मिश्र ही माहिती विचारण्यात आली. प्रश्न क्र. ८ मध्ये शाळेच्या व्यवस्थापनाचा प्रकार विचारण्यात आला. प्रश्न क्र. ९ मध्ये शाळेच्या अनुदानाचे स्वरूप विचारण्यात आले. क्र. १० मध्ये शाळेतील एकूण कर्मचारी, स्त्री-पुरूष प्रमाण याबाबत माहिती विचारण्यात आली.

नमुना निवड पध्दतीने जिल्ह्यातील एकूण २३७ मुख्याध्यापकांना प्रश्नावली देण्यात आली. त्यापैकी २०० मुख्याध्यापकांनी त्यास प्रतिसाद दिला. त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे माध्यमिक शाळांविषयी जी माहिती प्राप्त झाली ती प्राप्त माहिती पुढे कोष्टक रूपाने देण्यात येत आहे व प्रतिसादक मुख्याध्यापकांची यादी परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आली आहे.


**कोष्टक क्र. ५.०४**

**माध्यमिक शाळांचे ठिकाण.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | शहरी | ८१ | ४०.५० |
| २. | ग्रामीण | ११९ | ५९.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

उपरोक्त कोष्टक क्रमांक ५.०४ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यात शहरी व ग्रामीण या दोन्ही भागात माध्यमिक शाळा अस्तित्वात आहेत. यामध्ये शहरी भागात असणाऱ्या माध्यमिक शाळांचे प्रमाण ४०.५० % आहे तर यामध्ये ग्रामीण भागात असणाऱ्या माध्यमिक शाळांचे प्रमाण ५९.५० % आहे. जिल्ह्यातील एकूण ग्रामीण व शहरी लोकसंख्येच्या तुलनेत शाळांचे प्रमाण संशोधकास योग्य वाटते. ग्रामीण भागात राहणारी लोकसंख्या शहरी लोकसंख्येच्या तुलनेत अधिक आहे, त्याचबरोबर ग्रामीण भागातील अनेक पालक शिक्षणाच्या योग्य सोयींसाठी

५. शाळांचा प्रकार (मुलींची/मिश्र) दर्शविणारा आलेख.



आपल्या पाल्यास शहरात ठेवतात. म्हणून लोकसंख्येच्या प्रमाणात शहरी भागात जास्तीच्या माध्यमिक शाळांची गरज भासते हे संशोधकाच्या लक्षात आले.

प्रश्न क्र. ७ मध्ये शाळांच्या प्रकाराविषयी (मुले, मुली, मिश्र) माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्रमांक ५.०५ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्र. ५.०५**

**शाळांच्या प्रकाराविषयी.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मुलांची | ०० | ००.०० |
| २. | मुलींची | ०७ | ०३.५० |
| ३. | मुलां-मुलींची मिश्र | १९३ | ९६.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

उपरोक्त कोष्टक क्रमांक ५.०५ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यात फक्त मुलांची स्वतंत्र अशी एकही शाळा नाही. ०३.५० % शाळा मुलींच्यासाठी स्वतंत्र आहेत तर उर्वरित ९६.५० % शाळा या मुला-मुलींच्या मिश्र आहेत.

वरील माहिती वरून असे स्पष्ट होते की, जिल्ह्यात मुला-मुलींच्या मिश्र शाळांचे प्रमाण अधिक आहे. मुलींच्यासाठी स्वतंत्र शाळांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. त्यात वाढ होणे गरजेचे आहे असे संशोधकास वाटते


प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ८ मध्ये शाळेच्या व्यवस्थापन प्रकाराविषयी माहिती विचारण्यात आली होती. प्राप्त माहिती कोष्टक क्रमांक ५.०६ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्र. ५.०६**

**शाळांव्यवस्थापन प्रकाराविषयी.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्वयंसेवी संस्था | २०० | १००.०० |
| २. | धार्मिक संस्था | ०० | ००.०० |
| ३. | इतर | ०० | ००.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

६.माध्यमिक शाळांच्या अनुदानाचे स्वरूप दर्शविणारा आलेख.



उपरोक्त कोष्टक क्रमांक ५.०६ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, जिल्ह्यातील संपूर्ण माध्यमिक शाळा या स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जातात. वास्तविक पाहता जिल्ह्यात जिल्हा परिषदे मार्फत चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक शाळांची संख्या ५० आहे, परंतु अशा शाळांच्या प्रशासनाचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आलेला नाही. कारण अशा शाळांचे प्रशासन हे शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचे अधिपत्याखाली चालते. कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तीका, अनुदान, शालेय इमारत इत्यादी बाबीत या शाळा परिपूर्ण असतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ९ मध्ये शाळेच्या अनुदान स्वरूपाविषयी माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.०७ मध्ये देण्यात आलेली आहे.


**कोष्टक क्र. ५.०७**

**माध्यमिक शाळांच्या अनुदानाचे स्वरूप.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | पूर्णतः अनुदानीत | १४७ | ७३.५० |
| २. | विना अनुदानीत | ०५ | ०२.५० |
| ३. | अंशतः अनुदानीत | ३१ | १५.५० |
| ४. | कायम विना अनुदानीत | १७ | ०८.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.०७ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यात पूर्णतः अनुदानीत माध्यमिक शाळांची संख्या ७३.५० % आहे. विना अनुदानीत माध्यमिक शाळांची संख्या ०२.५० % आहे. अंशतः अनुदानीत माध्यमिक शाळांची संख्या १५.५० % आहे आणि कायम विना-अनुदानीत माध्यमिक शाळांची संख्या ०८.५० % आहे. यात पूर्णतः अनुदानीत माध्यमिक शाळांची संख्या सर्वाधिक आहे. ही बाब संशोधकाला समाधानकारक वाटली. योग्य व वेळेवर वेतन मिळाल्याशिवाय कर्मचारी आपली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडत नाही. म्हणून कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी शाळेला अनुदान असणे गरजेचे आहे. कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांच्या जाणिवेवरतीच कामाचा दर्जा व यश अवलंबून असते. जिल्ह्यात पूर्णतः अनुदानीत

## ७. माध्यमिक शाळांतील स्त्री व पुरूष शिक्षकांची संख्या दर्शविणारा आलेख.



माध्यमिक शाळांची संख्या अधिक असल्यानेच जिल्ह्याचा शैक्षणिक नावलौकिक महाराष्ट्रात **"लातूर पॅटर्न"** म्हणून परिचीत आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १० मध्ये शाळेतील एकूण कर्मचाऱ्यांविषयी माहिती विचारण्यात आली होती. त्यात स्त्री व पुरूष यांची संख्या स्वतंत्रपणे विचारण्यात आली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून याबाबतची प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.०८मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्र. ५.०८**

**माध्यमिक शाळांतील स्त्री व पुरूष शिक्षकांची संख्या.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्त्री शिक्षक | १६२ | ११.६८ |
| २. | पुरूष शिक्षक | १२२५ | ८८.३२ |
| | एकूण | १३८७ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.०८ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यात माध्यमिक शिक्षका म्हणून काम करणाऱ्या शिक्षिकांचे प्रमाण ११.६८% आहे. लातूर जिल्ह्यात माध्यमिक शिक्षक म्हणून काम करणाऱ्या पुरूष शिक्षकांचे प्रमाण ८८.३२ % आहे. स्त्री शिक्षिकांचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने त्यात वाढ होणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १० मध्ये माध्यमिक शाळातील स्त्री व पुरूष शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विषयी माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.०९ मध्ये देण्यात आली आहे.


**कोष्टक क्र. ५.०९**

**माध्यमिक शाळातील स्त्री व पुरूष शिक्षकेत्तर कर्मचारी संख्या.**

| अनु क्र.. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्त्री कर्मचारी | १९ | ०२.६० |
| २. | पुरूष कर्मचारी | ७१२ | ९७.४० |
| | एकूण | ७३१ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.०९ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की,

८. माध्यमिक शाळांचा संवर्ग दर्शविणारा आलेख.



लातूर जिल्ह्यात माध्यमिक शाळेत काम करणाऱ्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यात स्त्री कर्मचाऱ्यांचे प्रमाण ०२.६० % आहे. माध्यमिक शाळेत काम करणाऱ्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यात पुरूष कर्मचाऱ्यांचे प्रमाण ९७.४० % आहे. यावरून संशोधकास असे वाटते की, स्त्री कर्मचाऱ्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. त्यात वाढ होणे गरजेचे आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ११ मध्ये शाळेतील एकूण वर्गांची संख्या याविषयी माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादकाकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.१० मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्र. ५.१०**

**माध्यमिक शाळांच्या संवर्गाविषयी.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ५ ते १० | ७७ | ३८.५० |
| २. | ८ ते १० | ६७ | ३३.५० |
| ३. | ५ ते १२ | १९ | ०९.५० |
| ४. | ८ ते १२ | ३७ | १८.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.१० चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यात ५ ते १० अशा माध्यमिक शाळांची संख्या ३८.५० % आहे. ८ ते १० अशा माध्यमिक शाळांची संख्या ३३.५० % आहे. ५ ते १२ अशा माध्यमिक शाळांची संख्या ०९.५० % आहे. ८ ते १२ अशा माध्यमिक शाळांची संख्या १८.५० % आहे.

वरील माहितीत ८ ते १० या माध्यमिक शाळांची संख्या सर्वाधिक आहे. प्राप्त माहितीवरून असे निरिक्षणास आले की, ११ व १२ वी वर्ग हे प्रामुख्याने शहरी भागातील माध्यमिक शाळांना जोडलेले आहेत. ग्रामीण भागात उच्च माध्यमिक वर्गांची संख्या तुलनेने कमी आहे. त्यातही ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक शाळांमध्ये बहुतांश ठिकाणी विज्ञान व वाणिज्य शाखा अस्तित्वात नाहीत.

**५.०४ कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर.**

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १२ मध्ये कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तीकेविषयी माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.११ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्र. ५.११**

**कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकांविषयी.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | १७९ | ८९.५० |
| २. | नाही | २१ | १०.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.११ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ८९.५० % माध्यमिक शाळांत सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका अद्ययावत स्वरूपात भरलेल्या आहेत. १०.५० % माध्यमिक शाळांत कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका भरलेल्या नाहीत. कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका न भरलेल्या शाळांमध्ये प्रामुख्याने विना-अनुदानीत, कायम विना-अनुदानीत व अंशतः अनुदानीत शाळांचा समावेश आहे.

१०.५० % शाळांमध्ये कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका भरलेल्या नाहीत ही बाब संशोधकास खेदाची वाटते. सेवापुस्तिका हे कर्मचाऱ्यांच्या सेवेतील अत्यंत महत्त्वाचे दप्तर आहे. तो त्याच्या सेवेचा आरसा आहे. म्हणून संपूर्ण शाळांतून कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका वेळच्यावेळी भरणे बंधनकारक असावे, असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्र. १३ मध्ये शिक्षकांना पुरविल्या जाणाऱ्या दप्तराविषयी माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.१२ मध्ये देण्यात आली आहे.


**कोष्टक क्र. ५.१२**

**शिक्षकांना पुरविल्या जाणाऱ्या शालेय दप्तराविषयी.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | २०० | १००.०० |
| २. | नाही | ०० | ००.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.१२ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांना आवश्यक असणारे शालेय

९. गैरहजर विद्यार्थ्यांच्या पालकांचा प्रतिसाद दर्शविणारा आलेख.



दप्तर वेळेवर पुरविणाऱ्या शाळांचे प्रमाण १००% आहे. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली. शालेय दप्तर न पुरविणारी एकही शाळा जिल्ह्यात नसल्याचे संशोधकास दिसून आले.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १४ मध्ये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीविषयी माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.१३ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्र. ५.१३**

**विद्यार्थ्यांच्या हजेरीबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | २०० | १००.०० |
| २. | नाही | ०० | ००.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.१३ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांची हजेरी दररोज घेतली जाते. ही बाब संशोधकास अत्यंत समाधानाची वाटली.

प्रश्नवलीत प्रश्न क्र. १६ व १७ मध्ये गैरहजर विद्यार्थ्यांच्या पालकांशी संपर्क व त्यास पालकांचा प्रतिसाद याविषयी माहिती विचारण्यात आली होती. सर्व शाळा गैरहजर विद्यार्थ्यांच्या पालकांना कल्पना देवून अशा पालकांना त्वरीत कार्यालयाशी संपर्क करण्याविषयी सूचना देतात. असे संशोधकाच्या लक्षात आले. अशा सूचनेस पालकांचा मिळणारा प्रतिसाद प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून मिळलेल्या माहितीच्या आधारे कोष्टक क्र. ५.१४ मध्ये देण्यात आलेला आहे.

**कोष्टक क्र. ५.१४**

**गैरहजर विद्यार्थ्यांच्या पालकांचा प्रतिसाद.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ८८ | ४४.०० |
| २. | नाही | ०७ | ०३.५० |
| ३. | संमिश्र | १०५ | ५२.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.१४ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यात माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अनुपस्थिती बाबत पालकांना कल्पना दिल्यास त्यास ४४ % शाळेत पालक योग्य प्रतिसाद देतात. ०३.५० % शाळेत पालक प्रतिसाद देत नाही. तर ५२.५० % शाळेत पालकांचा प्रतिसाद संमिश्र स्वरूपाचा आहे. चांगला प्रतिसाद असणाऱ्या माध्यमिक शाळांची सर्वाधिक संख्या ही शहरी भागात आहे. तर कमी व संमिश्र प्रतिसाद असणाऱ्या माध्यमिक शाळांची संख्या ग्रामीण भागात अधिक आहे. शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या विकासासाठी पालकात जागृती निर्माण करणे संशोधकास गरजेचे वाटते. पालकांना देखील शिक्षणाचे महत्त्व व पाल्याची प्रगती याची जाणीव असणे गरजेचे आहे.

प्रश्नवलीतील प्रश्न क्र.१८ मध्ये विद्यार्थ्यांच्या दैनंदिन हजेरीवरती शिक्षक महिना अखेरीस मुख्याध्यापकांची सही घेतात की नाही या विषयी माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.१५ मध्ये देण्यात आली आहे.


**कोष्टक क्र. ५.१५**

**हजेरीवर मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रनाण |
|---|---|---|---|
| १. | होय | २०० | १००.०० |
| २. | नाही | ०० | ००.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.१५ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यात सर्व माध्यमिक शाळांतील सर्व शिक्षक महिना अखेरीस विद्यार्थी हजेरीवरती मुख्याध्यापकांची स्वाक्षरी घेतात. विद्यार्थी हजेरेवरती महिना अखेरीस मुख्याध्यापकांची सही न घेणारी एकही शाळा जिल्ह्यात नाही. ही बाब अत्यंत समाधानाची आहे. मुख्याध्यापकांची प्रत्येक महिण्यास विद्यार्थी हजेरीवरती सही घेतल्यामुळे मुख्याध्यापकास शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या, एकूण मुले, एकूण मुली, सतत हजर असणारे विद्यार्थी, सतत गैरहजर असणारे विद्यार्थी, नवीन प्रवेश व महिना भरात कमी करण्यात आलेले विद्यार्थी याची माहिती मिळते. ही माहिती मुख्याध्यापकास

१०. स्वतंत्र ग्रंथालय दर्शविणारा आलेख.



असणे गरजेचे आहे. कारण मुख्याध्यापक हा शाळेचा प्रमुख प्रशासक आहे. या बाबतीत जिल्ह्यातील परिस्थिती समाधानकारक असल्याचे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न १९ मध्ये शिक्षकांच्या वेळापत्रक व वार्षिक नियोजनाबाबत माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादकाकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.१६ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्र. ५.१६**

**वेळापत्रक व वार्षिक नियोजन.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | सर्व ठेवतात | १९१ | ९५.५० |
| २. | काही ठेवतात | ०९ | ०४.५० |
| ३. | कोणीही ठेवत नाही | ०० | ००.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.१६ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ९५.५० % शाळांत वेळापत्रक व वार्षिक नियोजन सर्व शिक्षक विहित नमुण्यात ठेवतात. ०४.५० % शाळांत वेळापत्रक व वार्षिक नियोजन काही शिक्षक विहित नमुण्यात ठेवतात. वेळापत्रक व वार्षिक नियोजन विहित नमुण्यात न ठेवणारी एकही शाळा किंवा शिक्षक जिल्ह्यात नाही. ही बाब अत्यंत समाधानाची आहे. नियोजनाशिवाय उद्दिष्ट साध्य करता येत नाही. त्या दृष्टिने विचार केल्यास जिल्ह्यात वेळापत्रक व वार्षिक नियोजन करणाऱ्या शाळांचे प्रमाण उत्तम असल्याचे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २० मध्ये स्वतंत्र ग्रंथालयाविषयी माहिती विचारण्यात आली होती. प्राप्त माहिती कोष्टक क्र. ५.१७ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.१७**

**स्वतंत्र ग्रंथालयाबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | १०६ | ५३.०० |
| २. | नाही | ९४ | ४७.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.१७ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यात स्वतंत्र ग्रंथालय असणाऱ्या माध्यमिक शाळांचे प्रमाण ५३.०० % आहे. तर ४७.०० % माध्यमिक शाळांमध्ये ग्रंथालयाची स्वतंत्र सोय नाही. सर्व शाळेत ग्रंथालय स्वतंत्र असणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते. ग्रंथालय हा शाळेचा आत्मा आहे. कोणत्याही शाळेचा दर्जा त्या शाळेतील ग्रंथालय, ग्रंथालयातील ग्रंथ व त्याचा दर्जा याचेवरती अवलंबून असतो. त्यासाठी सर्व शाळेत ग्रंथालय स्वतंत्र व दर्जेदार असले पाहिजे असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्र.२१ मध्ये स्वतंत्र ग्रंथपालाविषयी माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादकाकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.१८ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.१८**

**स्वतंत्र ग्रंथपालाबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | पूर्णवेळ ग्रंथपाल आहे. | ०५ | ०२.५० |
| २. | अर्धवेळ ग्रंथपाल आहे. | २७ | १३.५० |
| ३. | विषय शिक्षकाकडे अतिरिक्त कार्यभार सोपविलेला आहे. | १७८ | ८४.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.१८ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यात पूर्ण वेळ ग्रंथपाल असणाऱ्या शाळांचे प्रमाण ०२.५० % आहे. अर्धवेळ ग्रंथपाल असणाऱ्या शाळांचे प्रमाण १३.५० % आहे. ग्रंथपाल नसल्यामुळे विषय शिक्षकाकडे ग्रंथपालपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविलेल्या शाळांचे प्रमाण ८४.०० % आहे. ग्रंथालय हा शाळेचा आत्मा असल्यामुळे प्रत्येक शाळेत स्वतंत्र ग्रंथपाल असणे संशोधकास गरजेचे वाटते. ग्रंथपालास ग्रंथालयाची संपूर्ण माहिती असते. ग्रंथपाल स्वतंत्र नसेल तर विषय शिक्षक वर्गावर असल्यास विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध होवू शकत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होते. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी ग्रंथपाल स्वतंत्र असावा असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २२ मध्ये शाळेत येणारी मासिके, क्रमिकपुस्तके, परिपत्रके, संदर्भ ग्रंथ इत्यादीच्या स्वतंत्र नोंदीविषयो माहिती विचारण्यात आली होती. याबाबतोत प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.१९ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्र. ५.१९**

**मासिके, क्रमिकपुस्तके, परिपत्रके, संदर्भ ग्रंथ इ.च्या स्वतंत्र नोंदीबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | १९७ | ९८.५० |
| २. | नाही | ०३ | ०१.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.१९ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यात मासिके, क्रमिकपुस्तके, परिपत्रके, संदर्भ ग्रंथ इ.ची नोंद स्वतंत्र स्वरूपात ठेवणाऱ्या माध्यमिक शाळांचे प्रमाण ९८.५० % आहे. १.५० % शाळा या नोंदी स्वतंत्र स्वरूपात ठेवत नाहीत. सर्व शाळांत या नोंदी स्वतंत्र स्वरूपात ठेवल्या जाव्यात असे संशोधकास वाटते.

प्रश्नवलीतील प्रश्न क्र. २३ मध्ये शाळा तपासणीस येणाऱ्या तपासणी अधिकाऱ्यांसाठी असणाऱ्या स्वतंत्र नोंदवही /अभिप्राय पुस्तिकाविषयी माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.२० मध्ये देण्यात आलेली आहे.


**कोष्टक क्र. ५.२०**

**तपासणी अधिकाऱ्यासाठी स्वतंत्र नोंदीवहीबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | २०० | १००.०० |
| २. | नाही | ०० | ००.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.२० चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यात सर्व माध्यमिक शाळेत तपासणी अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र नोंदवही उपलब्ध आहे. ही बाब संशोधकास समाधानाची वाटते.

११. शालेय तपासणीची वस्तूनिष्ठता दर्शविणारा आलेख.



प्रश्नावलीत प्रश्न क्र. २४ मध्ये तपासणी पथकातील विषयनिहाय तज्ञ सदस्यांबद्दल माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादकाकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.२१ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.२१**

**तपासणी पथकातील विषयनिहाय तज्ञ शिक्षकांबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | १६७ | ८३.५० |
| २. | नाही | ३३ | १६.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.२१ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ८३.५० % शाळांच्या मुख्याध्यापकांचे मत असे आहे की, तपासणी पथकात विषयनिहाय तज्ञ शिक्षकांचा समावेश असतो. जिल्ह्यातील १६.५० % शाळांच्या मुख्याध्यापकांचे मत असे आहे की, तपासणी पथकात विषयनिहाय तज्ञ शिक्षकांचा समावेश नसतो. शालेय तपासणीस वस्तूनिष्ठता प्राप्त होण्यासाठी तपासणी पथकात विषयनिहाय तज्ञ शिक्षक असावेत. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २५ मध्ये शालेय तपासणीच्या वस्तूनिष्ठतेबाबत माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.२२ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्र. ५.२२**

**शालेय तपासणीच्या वस्तूनिष्ठतेबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | १२७ | ६३.५० |
| २. | नाही | ७३ | ३६.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.२२ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ६३.५० % शाळांच्या मुख्याध्यापकांचे मत असे आहे की, शालेय तपासणी वस्तूनिष्ठ स्वरूपात होते. ३६.५० % शाळांच्या मुख्याध्यापकांचे मत असे

आहे की, शालेय तपासणी वस्तूनिष्ठ स्वरूपात होत नाही. वास्तविक पाहता शाळेची तपासणी संपूर्णतः वस्तूनिष्ठ स्वरूपात होणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते. जर शालेय तपासणी वस्तूनिष्ठ स्वरूपात होत नसेल तर तपासणीला अर्थ उरत नाही. शालेय तपासणी वस्तूनिष्ठ स्वरूपात होण्यासाठी जिल्ह्यातील एकूण शाळांची संख्या लक्षात घेवून तपासणीसाठी आवश्यक असणारे शिक्षणविस्ताराधिकारी व उपशिक्षणाधिकारी यांच्या नेमणूका केलेल्या असाव्यात असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २६ हा शाळेतून विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या दाखल्यावरील नोंदी अचूक असल्याची खात्री करण्याबाबत होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून याबाबतची प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.२३ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.२३**


**विद्यार्थ्यांच्या दाखल्यावरील नोंदींच्या खात्रीबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | २०० | १००.०० |
| २. | नाही | ०० | ००.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.२३ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक शाळेतून विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या दाखल्यावरील नोंदी बरोबर असल्याची खात्री करून घेतात. ही बाब समाधानची आहे असे संशोधकास वाटते. दाखला हा विद्यार्थ्याचा अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज आहे. त्यामुळे दाखल्यावरील संपूर्ण नोंदी बरोबर असल्याची खात्री करून घेणे ही मुख्याध्यापकाची महत्त्वाची जबबदारी आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २७, २८ व २९ मध्ये शालेय व्यवस्थापन समितीविषयी माहिती मिळविण्यासाठी प्रश्न विचारण्यात आले होते. त्यामध्ये सर्व शाळेत शालेय व्यवस्थापन समिती कार्यरत आहे व शालेय व्यवस्थापन समितीच्या बैठका बोलविल्या जातात असे सर्व प्रतिसादक मुख्याध्यापकंनी नमूद केले. शालेय व्यवस्थापन समितीच्या बैठकीच्या कालावधीबाबत प्रतिसादक मुख्याध्यापकांनी दिलेली माहिती कोष्टक क्र. ५.२४ मध्ये देण्यात आलेली आहे.

१२. शालेय व्यवस्थापन समितीच्या बैठकीच्या कालावधीबाबतचा आलेख.



## कोष्टक क्र. ५.२४


**शालेय व्यवस्थापन समितीच्या बैठकीबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | प्रत्येक सत्राच्या सुरूवातीस | ८५ | ४२.५० |
| २. | शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीस | २२ | ११.०० |
| ३. | प्रसंगानुसार व नियमानुसार | ९३ | ४६.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.२४ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ४२.५० % शाळेत शालेय व्यवस्थापन समितीची बैठक प्रत्येक सत्राच्या सुरूवातीला घेतली जाते. ११.०० % शाळेत शालेय व्यवस्थापन समितीची बैठक शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातील घेतली जाते. ४६.५० % शाळेत शालेय व्यवस्थापन समितीची बैठक प्रसंगानुसार व नियमानुसार घेतली जाते. वास्तिवक पाहता शालेय व्यवस्थापन समितीची बैठक दर तीन महिन्यास व प्रसंगानुसार घेणे गरजेचे आहे असे संशोधकास वाटते. अशा बैठका होत असल्याचे वरून माहितीवरून कमी प्रमाणात दिसून येते. ही बाब संशोधकास खेदाची वाटते. त्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीच्या बैठकीचा कालावधी ठरवून देण्यात यावा असे संशोधकास वाटते. बैठकीच्या माध्यमातून भूतकाळातील चांगल्या कार्यांचा आढावा व भविष्यकाळातील कार्याचे नियोजन केले जाते. त्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीच्या बैठकीची गरज आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३०, ३१ व ३२ मध्ये शिक्षक-पालक संघाविषयी माहिती मिळविण्यासाठी प्रश्न विचारण्यात आले होते. लातूर जिल्ह्यातील सर्व प्रतिसादक मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेत शिक्षक-पालक संघ कार्यान्वीत असल्याचे नमूद केले. सर्वच शाळेत शिक्षक-पालक संघाच्या बैठका आयोजित केल्या जातात असे सर्व प्रतिसादक मुख्याध्यापकांचे मत आहे. प्रश्न क्र. ३२ मध्ये शिक्षक-पालक संघाच्या बैठकीच्या अहवालाच्या नोंदींबाबत माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.२५ मध्ये देण्यात आलेली आहे.

१३. शिक्षक-पालक संघाच्या बैठकीच्या अहवालाच्या नोंदीबाबतचा आलेख.



### कोष्टक क्र. ५.२५

### शिक्षक पालक संघाच्या बैठकीच्या अहवालाच्या नोंदीबाबत.

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | १६३ | ८१.५० |
| २. | नाही | ३७ | १८.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.२५ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ८१.५० % शाळेत शिक्षक-पालक संघाच्या बैठकींच्या अहवालाची नोंद ठेवली जाते. १८.५० % शाळेत शिक्षक-पालक संघाच्या बैठकींच्या अहवालाची नोंद ठेवली जात नाही. सर्व शाळेतून शिक्षक-पालक संघाच्या बैठकींच्या अहवालाची नोंद ठेवली जाणे आवश्यक आहे. सर्व पालकांचे मत जाणून घेवून शाळेच्या बाबतीत त्यांनी केलेल्या योग्य सूचनांची लिखीत स्वरूपात नोंद घेवून शाळेच्या प्रगतीसाठी या नोंदींचा विचार करणे गरजेचे आहे. पालक हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने त्यांचे मत विचारात घेणे तेवढे गरजेचे आहे.

शिक्षक-पालक संघाच्या बैठकीत पालकांनी शाळेच्या बाबतीत काही उणिवा किंवा दोष सांगितले असतील तर अशा उणिवा व दोषांची लिखीत स्वरूपात नोंद ठेवून त्या दूर करण्यासाठी व्यवस्थापन समितीने प्रयत्न केले पाहिजेत. अन्यथा शिक्षक-पालक संघाच्या बैठकांना अर्थ उरणार नाही असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३३ मध्ये शासनाकडून मिळणाऱ्या वेतनेतर अनुदाना बाबत माहिती विचारण्यात आलेली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.२६ मध्ये देण्यात आलेली आहे.

### कोष्टक क्र. ५.२६

### वेतनेतर अनुदानाबाबत.

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ६१ | ३०.५० |
| २. | नाही | १३९ | ६९.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.२६ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, जिल्ह्यात शासनाकडून मिळणारे वेतनेतर अनुदान पुरेसे आहे असे नमुद करणाऱ्या शाळांची संख्या ३०.५० % आहे. तर शासनाकडून मिळणारे वेतनेतर अनुदान पुरेसे नाही असे नमूद करणाऱ्या शाळांची संख्या ६९.५० % आहे. शाळेच्या विकासासाठी शाळेत विविध शैक्षणिक उपक्रम राबविणे गरजेचे आहे. असे उपक्रम राबविण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी शाळेची आर्थिक परिस्थिती चांगली असणे गरजेचे आहे. शाळेत सर्व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करण्यासाठी शाळेला पैशाची गरज आहे. म्हणून शाळांना वेळोवेळी व योग्य असे वेतनेतर अनुदान शासनाकडून वेळेवर मिळणे गरजेचे आहे असे संशोधकास वाटते. प्रत्यक्ष मुख्याध्यापकांबरोबर चर्चा केल्यानंतर संशोधकाच्या असे लक्षात आले की, शासनाकडून वेतनेतर अनुदान पुरेशा प्रमाणात मिळत नाही. जे अनुदान मिळते ते देखील वेळेवर दिले जात नाही. शाळेच्या प्रगतीसाठी व देशाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी वेतनेतर अनुदान योग्य वेळी व योग्य प्रमाणात दिले जावे असे संशोधकास असे वाटते.

**५.०५ माध्यमिक शाळांतील शिक्षकांविषयी माहिती.**

माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांना दिलेल्या प्रश्नावलीच्या चौथ्या भागात शाळेतील शिक्षकांविषयी माहिती विचारलेली होती. शाळेच्या प्रगतीसाठी शाळेत काम करणारे सर्व शिक्षक व कर्मचारी आणि मुख्याध्यापक यांचे संबंध सौजन्यपूर्ण असणे गरजेचे आहे. असे संबंध असतील तर मुख्याध्यापक आपली शैक्षणिक व प्रशासकीय कामे व कर्तव्ये व्यवस्थितपणे पार पाडू शकतील. अन्यथा त्यांना आपले कामकाज व प्रशासन व्यवस्थीतपणे पूर्ण करता येणार नाही. मुख्याध्यापकांना शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकडूनच प्रशासनातील बाबी पूर्ण करून घ्याव्या लागतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३४ मध्ये शाळेत सर्व विषयाच्या शिक्षकांची नियुक्ती केलेली आहे काय? असे विचारण्यात आले होते. प्रतिसादक मुख्याध्यापकांनी दिलेली माहिती कोष्टक क्र. ५.२७ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.२७**

**विषय शिक्षकांच्या नियुक्तीबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | २०० | १००.०० |
| २. | नाही | ०० | ००.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.२७ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळेत विषयनिहाय तज्ञ शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. ही बाब संशोधकास समाधानकारक वाटली. विषयनिहाय तज्ञ शिक्षक नियुक्त केल्याशिवाय ते अपल्या अध्यापन विषयास व अध्यापनास न्याय देवू शकणार नाहीत. त्यादृष्टीने सर्व शाळांत विषयनिहाय तज्ञ शिक्षक नियुक्त केलेले आहेत. ही बाब समाधानाची आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३५ मध्ये दैनिक पाठ अध्यापनाच्या टाचणाबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून याबाबतची प्राप्त माहिती कोष्टक क्र. ५.२८ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्र. ५.२८**


**दैनिक पाठ अध्यापनाच्या टाचणाबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | २०० | १००.०० |
| २. | नाही | ०० | ००.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.२८ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळांतील सर्व शिक्षक दैनिक पाठ अध्यापनाचे टाचण काढतात. ही बाब समाधानाची आहे. अध्यापनात विषयज्ञान, अध्यापन कौशल्य, अध्यापन पध्दती इत्यादीबरोबरच पाठाचे टाचण देखील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. पाठ टाचणाशिवाय अध्यापण करणे चूकीचे आहे असे संशोधनास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३६ पाठ निरीक्षणाबाबत विचारण्यात आला होता. प्राप्त माहिती कोष्टक क्र. ५.२९ मध्ये देण्यात आलेली आहे.

## १४. पाठ निरीक्षणात लक्षात घेतल्या जाणाऱ्या घटकांबाबचा आलेख.



**कोष्टक क्र. ५.२९**

**पाठ निरीक्षणाबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | १७१ | ८५.५० |
| २. | नाही | २९ | १४.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.२९ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ८५.५० % मुख्याध्यापक शिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण करतात. १४.५० % मुख्याध्यापक शिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण करत नाहीत. प्रत्यक्ष चर्चेतून संशोधकाच्या असे लक्षात आले की, ज्या शाळेत उपमुख्याध्यापक अथवा पर्यवेक्षक यांच्या नियुक्ता केलेल्या आहेत अशा शाळेतील मुख्याध्यापक शिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण स्वतः करत नाहीत तर ते निरीक्षणाचे काम उपमुख्याध्यापक अथवा पर्यवेक्षकाकडून करून घेतात.


प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३७ मध्ये पाठ निरीक्षण करताना मुख्याध्यापक कोणकोणत्या बाबी लक्षात घेतात या विषयी माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.३० मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.३०**

**पाठ निरीक्षणात लक्षात घेतल्या जाणाऱ्या घटकांबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | विषयाची तयारी | १७१ | ८५.५० |
| २. | विषयज्ञान | १८० | ९०.०० |
| ३. | अध्यापन शैली | १६१ | ८०.५० |
| ४. | प्रश्न पध्दती | ९२ | ४६.०० |
| ५. | विद्यार्थ्यांचा पाठात सहभाग | ६२ | ३१.०० |
| ६. | पाठाचे टाचण | २०० | १००.०० |
| ७. | फलक लेखन | १३१ | ६५.५० |
| ८. | गृहपाठ | १४१ | ७०.५० |
| ९. | मूल्यमापन | १२९ | ६४.५० |

१५ मुख्याध्यापकांच्या नमुना पाठाबाबतचा आलेख.



वरील कोष्टक क्रमांक ५.३० चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ८५.५० % मुख्याध्यापक पाठाचे निरीक्षण करीत असताना पाठाची तयारी लक्षात घेतात. ९०.०० % मुख्याध्यापक विषय ज्ञान ही बाब लक्षात घेतात. ८०.५० % मुख्याध्यापक अध्यापन शैलीवरती लक्ष केंद्रीत करतात. ४६.०० % मुख्याध्यापक शिक्षकांची प्रश्नपध्दती विचारात घेतात. ३१.०० % मुख्याध्यापक विद्यार्थ्यांचा पाठातील सहभाग महत्त्वाचा समजतात. १००.०० % मुख्याध्यापक पाठाचे टाचण पाहतात. ६५.५० % मुख्याध्यापक फलक लेखन पाहतात. ७०.५० % मुख्याध्यापक गृहपाठावरती लक्ष केंद्रीत करतात. ६४.५० % मुख्याध्यापकांना मूल्यमापण महत्त्वाचे वाटते.

पाठनिरीक्षण करताना सर्व बाबी मुख्याध्यापकांनी काटेकोरपणे पाहव्यात व शिक्षकाकांसाठी मुख्याध्यापकांनी स्वतः नमुना पाठ घ्यावा असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३८ मध्ये मुख्याध्यापक शिक्षकांसाठी स्वतः नमुना पाठ घेतात का? ही माहीती जाणून घेण्यासाठी प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.३१ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.३१**

**मुख्याध्यापकांच्या नमुना पाठाबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | १३७ | ६८.५० |
| २. | नाही | ६३ | ३१.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.३१ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ६८.५० % शाळेत स्वतः मुख्याध्यापकांकडून शिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण केले जाते. ३१.५० % शाळेत शिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण मुख्याध्यापकांकडून केले जात नाही. मुख्याध्यापकांबरोबर केलेल्या प्रत्यक्ष चर्चेतून संशोधकाच्या असे लक्षात आले की, यातील काही शाळांमध्ये उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक शिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण करतात. काही शाळांतून शिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण केले जात नाही. ही बाब खेदाची आहे. शिक्षकांचे अध्यापन कौशल्य विकसीत करण्यासाठी, अध्यापनातील उणीवा व दोष दूर करण्यासाठी त्यांच्या पाठाचे निरीक्षण होणे गरजेचे आहे. त्यासाठी मुख्याध्यापक

स्वतः उत्कृष्ट अध्यापक असणे आवश्यक आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३९ हा शैक्षणिक साहित्याच्या वापराबाबत विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून याबाबतची प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.३२ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.३२**

**अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापराबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | १८७ | ९३.५० |
| २. | नाही | १३ | ०६.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.३२ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यात ९३.५० % माध्यमिक शाळेत शिक्षक दैनिक अध्यापनात शैक्षणिक साहित्यांच्या वापर करतात. ०६.५० % माध्यमिक शाळेत शिक्षक दैनिक अध्यापनात शैक्षणिक साहित्यांचा वापर करत नाहीत. अध्यापन अधिक परिणामकारक होण्यासाठी अध्यापनात शैक्षणिक साहित्यांचा वापर करणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते. शैक्षणिक साहित्यांच्या वापराशिवाय पाठ अध्यापन हे नीरस ठरेल व विद्यार्थी पाठात सहभाग नोंदवणार नाहीत.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४० हा वार्षिक अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होत असल्याबद्दलची माहिती मिळविण्याबाबतचा होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे संशोधकाच्या असे लक्षात आले की, जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळेत वार्षिक अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होतो. ही बाब समाधानाची आहे. ठरवून दिलेला अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करणे हे शिक्षकाचे कर्तव्य आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४१ हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या जादा तासीकेबाबत होता. प्रतिसाकद मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे संशोधकाच्या असे लक्षात आले की, लातूर जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळेत अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी जादा तासिकेचे नियोजन केले जाते.

संशोधकाला असे वाटते की, गणित व इंग्रजी यासारख्या विषयास ज्यादा

तासिकेची आवश्यकता आहे. माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांसाठी हे विषय महत्त्वाचे व कठीण असल्याने याविषयांना ज्यादा तासिकांची गरज आहे. जिल्ह्यात सर्व शाळेतून ज्यादा तासिका घेतल्या जातात ही बाब समाधानाची आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४२ हा शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या गरजेबाबत विचारण्यात आला होता. जिल्ह्यातील प्रतिसादक मुख्याध्यापकांचे संपूर्णतः असे मत आहे की, शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या सेवांर्गत प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.

सेवांर्गत प्रशिक्षण हे शिक्षकांना गरजेचे आहे असे संशोधकास वाटते. अशा प्रक्षिणांमुळे शिक्षकांची अध्यापन शैली विकसित होते. शिक्षकांच्या ज्ञानात भर पडते. शिक्षकांना नवनवीन बाबींची माहिती मिळते. या सर्वांचा फायदा शिक्षकांच्या अध्यापनात होतो. परिणामी अध्यापन परिणामकारक होते. विद्यार्थी अध्यापनात रस घेतात. त्यांची शिक्षणाची आवड वाढते. म्हणून संशोधकाच्या मते सेवांतर्गत प्रशिक्षण शिक्षकांसाठी आवश्यक आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४३ मध्ये विविध सेवांतर्गत प्रशिक्षणास शिक्षकांच्या प्रतिसादाबाबत माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.३३ मध्ये देण्यात आलेली आहे.


**कोष्टक क्र. ५.३३**

**सेवांतर्गत प्रशिक्षणास शिक्षकांचा प्रतिसाद.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | बरा | ८९ | ४४.५० |
| २. | चांगला | १११ | ५५.५० |
| ३. | उत्कृष्ट | ०० | ००.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.३३ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, विविध सेवांतर्गत प्रशिक्षणास माध्यमिक शाळांच्या शिक्षकांचा प्रतिसाद बरा असणाऱ्या शाळांची संख्या ४४.५० % आहे. अशा प्रशिक्षणास चांगला प्रतिसाद असणाऱ्या शाळांचो संख्या ५५.५० % आहे. उत्कृष्ट प्रतिसाद असणाऱ्या शाळांची संख्या जिल्ह्यात नाही.

१६.विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविणे बाबत माहिती दर्शविणारा आलेख.



शिक्षकांच्यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षण आवश्यक असले तरीदेखील अशा प्रशिक्षणात दिली जाणारी माहिती विशेष नसते अथवा प्रशिक्षणासाठी असणारे मार्गदर्शक बऱ्याच वेळा तज्ञ नसतात. असे मुख्याध्यापकांबरोबर केलेल्या चर्चेतून संशोधकाच्या लक्षात आले

**५.०६ विद्यार्थ्यांविषयी माहिती.**

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४४ मध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी शाळेकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची माहिती जागून घेगेबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.३४ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.३४**

**विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविणे बाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | पालक संपर्क | २०० | १००.०० |
| २. | पत्र व्यवहार | ८३ | ४१.५० |
| ३. | पालक मेळावे | १३७ | ६८.५० |
| ४. | सहशालेय उपक्रमांचे आयोजन | १६१ | ८०.५० |

वरील कोष्टक क्रमांक ५.३४ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळा पालकांशी संपर्क साधतात. गैरहजर विद्यार्थ्यांच्या बाबतीत ४१.५० % शाळा पालकांशी पत्रव्यवहार करतात. ६८.५० % शाळा पालक मेळावे आयोजित करून पालकांना विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे महत्त्व समजून सांगतात. ८०.५० % शाळेत विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी विविध सहशालेय उपक्रमांचे आयोजन केले जाते.

विद्यार्थ्यांची उपस्थिती ही शाळेच्या विकासातील अत्यंत महत्त्वाची बाब आहे. विद्यार्थी सतत उपस्थित असल्याशिवाय त्याच्या अभ्यासात सातत्य राहणार नाही. म्हणून संशोधकास असे वाटते की, विद्यार्थ्यांची १०० % उपस्थिती टिकविण्यासाठी शाळेत विविध क्रार्यक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांत शिक्षणाची आवड निर्माण केली पाहिजे.

प्रश्नवलीतील प्रश्न क्र. ४५ मध्ये दिद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी शाळेत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती जागून घेण्यासाठी प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.३५ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.३५**

**शाळेत राबविले जाणारे विविध उपक्रम**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | निसर्ग शाळा | ३३ | १६.५० |
| २. | सांस्कृतिक कार्यक्रम | २०० | १००.०० |
| ३. | शैक्षणिक सहली | १११ | ५५.५० |
| ४. | विविध स्पर्धा | १६१ | ८०.५० |

वरील कोष्टक क्रमांक ५.३५ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यात विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी जे विविध उपक्रम राबविले जातात. त्यात निसर्ग शाळा हा उपक्रम राबविणाऱ्या शाळांचे प्रमाण १६.५० % आहे. १००.०० % शाळांमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ५५.५०% शाळांमध्ये शैक्षणिक सहलींचे आयोजन केले जाते. ८०.५० % शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करतात.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत विविध कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे असे संशोधकास वाटते. त्यासाठी अशा क्रार्यक्रमांची आवड असणारे शिक्षक शाळेत असणे आवश्यक आहे. अन्यथा विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या विविध कला गुणांना वाव मिळणार नाही. शालेय अभ्यासक्रमाबरोबरच इतर उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या विविध गुणांची पारख शिक्षकांनी केली पाहिजे. त्याच्या अंगी असणारा एखादा गुण भविष्यात राष्ट्राच्या कामी येऊ शकतो हे शिक्षकांनी ओळखले पाहिजे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४६ मध्ये उशीरा येणाऱ्या व गैरहजर विद्यार्थ्यांच्या बाबत केल्या जाणाऱ्या कार्यवाही संदर्भात माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांनी याबाबतची दिलेली माहिती कोष्टक क्र. ५.३६ देण्यात आली आहे.

## कोष्टक क्र. ५.३६

## उशिरा येणाऱ्या व गैरहजर विद्यार्थ्यांबाबत.

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रनाण |
|---|---|---|---|
| १. | पालक संपर्क | १७९ | ८९.५० |
| २. | विद्यार्थ्यांना समजावून सांगणे | ११० | ५५.०० |
| ३. | सौम्य शिक्षा | १९१ | ९५.५० |

वरील कोष्टक क्रमांक ५.३६ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यात उशीरा येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत पालकांशी संपर्क साधण्याचे प्रमाण ८९.५०% आहे. उपस्थितीचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजून सांगण्याचे प्रमाण ५५.००% आहे. गैरहजर विद्यार्थ्यांना सौम्य शिक्षा करण्याऱ्या शाळांचे प्रमाण ९५.५० % इतके आहे.


प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४७ मध्ये बौध्दिकदृष्ट्या सामान्य विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शाळांकडून केल्या जाणाऱ्या विशेष प्रयत्नांची माहिती जाणून घेण्यासाठी विचारण्यात आला होता. त्यास जिल्ह्यातील सर्व प्रतिसादक मुख्याध्यापकांनी असे विशेष प्रयत्न करत असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४८ मध्ये शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी शाळेकडून राबविल्या जाणाऱ्या विशेष उपक्रमांची माहिती घेणे हा उद्देश होता. जिल्ह्यातील सर्व प्रतिसादक मुख्याध्यापकांनी असे उपक्रम राबवित असल्याचे नमूद केले. ही बाब शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी फायद्याची आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४९ मध्ये विद्यार्थ्यांच्या नेतृत्त्व गुणांना वाव देण्यासाठी शाळा राबवत असलेल्या विशेष उपक्रमांची माहिती घेणे हा उद्देश होता. जिल्ह्यातील सर्व मुख्याध्यापकांनी असे विशेष उपक्रम राबवित असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ५० हा विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाटी राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांविषयी होता. याबाबतीत जिल्ह्यातील सर्व प्रतिसादक मुख्याध्यापकांनी असे उपक्रम राबवित असल्याचे नमूद केले. यात प्रश्न क्र. ५१ मध्ये अशा उपक्रमांची सविस्तर माहिती विचारलेली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांनी याबाबतची दिलेली माहिती कोष्टक क्र. ५.३७ मध्ये देण्यात आली आहे

## १७.सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी राबविले जाणारे उपक्रम दर्शविणारा आलेख.



### कोष्टक क्र. ५.३७

### सामाजिक जाणिव निर्माण करण्यासाठी राबविले जाणारे उपक्रम.


| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वृक्षारोपन, वृक्षदिंडी | १७९ | ८९.५० |
| २. | प्रासंगिक मदत फेरी | ९१ | ४५.५० |
| ३. | अंधश्रध्दा निर्मूलन | ८२ | ४१.५० |
| ४. | ग्राम स्वच्छता | १६७ | ८३.५० |
| ५. | समाज जागृती अभियान | १३२ | ६६.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.३७ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणिव निर्माण करण्यासाठी वृक्षारोपन व वृक्षदिंडी या कार्यक्रमांचे आयोजन करण्याऱ्या शाळांची संख्या ८९.५० % आहे. प्रासंगिक मदत फेरीचे आयोजन करण्याऱ्या शाळांची संख्या ४५.५० % आहे. अंधश्रध्दा निर्मूलन विषयक विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याऱ्या शाळांची संख्या ४१.५० % आहे. ग्राम स्वच्छता हा उपक्रम राबविणाऱ्या शाळांची संख्या ८३.५० % आहे. विविध विषयांवरती समाज जागृती अभियानाचे आयोजन करण्याऱ्या शाळांची संख्या ६६.०० % आहे.

शाळा ही समाजाची प्रतिकृती असल्याने विविध सामाजिक उपक्रम शाळेत राबविले जावेत असे संशोधकास वाटते. अशा प्रकारचे उपक्रम शासनाच्या इतर कोणत्याही विभागा मार्फत प्रभावीपणे राबविले जाऊ शकत नाहीत. शिक्षकांएवढा विश्वास समाजाचा इतर कोणत्याही घटकांवरती नसल्यामुळे असे उपक्रम शाळेच्या माध्यमातून यशस्वीरीत्या राबविले जावू शकतात. असे संशोधकास वाटते. म्हणून अशा उपक्रमाच्या बाबतीत शासनाने सर्व शाळांना बंधन करावे. असे संशोधकाचे मत आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ५२ हा जिल्ह्यास्तरीय विज्ञान मंच व विज्ञान मेळावे यात विद्यार्थ्यांच्या सहभागाविषयी विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांनी दिलेली माहिती कोष्टक क्र. ५.३८ मध्ये देण्यात आली आहे.

१८ जिल्हास्तरीय विज्ञान मंच/विज्ञान मेळावे यात विद्यार्थ्यांचा
सहभाग दर्शविणारा आलेख.



### कोष्टक क्र. ५.३८

### जिल्हास्तरीय विज्ञान मंच / विज्ञान मेळावे यात विद्यार्थ्यांचा सहभाग.

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ८१ | ४०.५० |
| २. | नाही | ११९ | ५९.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.३८ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ४०.५० % शाळांतील विद्यार्थी जिल्ह्यास्तरीय विज्ञान मंच व विज्ञान मेळावे यात सहभाग नोंदवतात. ५९.५० % शाळांतील विद्यार्थी जिल्ह्यास्तरीय विज्ञान मंच व विज्ञान मेळावे यात सहभाग नोंदवत नाहीत. ही बाब खेदाची आहे असे संशोधकास वाटते.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती बरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व वैज्ञानिक जाणीव निर्माण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी जिल्ह्यास्तरीय विज्ञान मंच व विज्ञान मेळावे यात सर्व शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ५३ मध्ये शालेय पातळीवर राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांबद्दल माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांनी याबाबतची दिलेली माहिती कोष्टक क्र. ५.३९ मध्ये देण्यात आली आहे.


### कोष्टक क्र. ५.३९

### विद्यार्थ्यासाठींचे विविध उपक्रम.

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | हस्ताक्षर स्पर्धा | २०० | १००.०० |
| २. | शुध्दलेखन स्पर्धा | २०० | १००.०० |
| ३. | वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा | १२१ | ६०.५० |
| ४. | विज्ञान उपक्रम निर्मिती स्पर्धा | ६७ | ३३.५० |

वरील कोष्टक क्रमांक ५.३९ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांपैकी सर्व माध्यमिक शाळांत विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर

१९. विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीचा कालावधी दर्शविणारा आलेख.



स्पर्धा आयोजित केल्या जातात. सर्व माध्यमिक शाळांत विद्यार्थ्यांसाठी शुध्दलेखन स्पर्धा आयोजित केल्या जातात. ६०.५० % शाळांत विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा आयोजित केल्या जातात. ३३.५० % शाळांत विज्ञान उपक्रम निर्मिती स्पर्धा आयोजित केल्या जातात. यावरून संशोधकास असे वाटते की, जिल्ह्याची विज्ञान उपक्रम निर्मिती स्पर्धेबाबतची अवस्था दयनीय आहे. ही जाणीव विद्यार्थ्यांत निर्माण करणे गरजेचे आहे. वक्तृत्व हा लोकशाहीचा कणा आहे. त्या दृष्टीने सर्व शाळांत विद्यार्थ्यांचे वक्तृत्व विकसित करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ५४ व ५५ मध्ये विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीविषयी माहिती विचारण्यात आलेली होती. सर्व प्रतिसादक मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करत असल्याचे नमूद केले. आरोग्य तपासणीचा कालावधी कोष्टक क्र. ५. ४० मध्ये नमूद करण्यात आलेला आहे.

**कोष्टक क्र. ५.४०**


**विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीचा कालावधी.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वर्षातून १ वेळा | ११३ | ५६.५० |
| २. | वर्षातून २ वेळा | ८७ | ४३.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.४० चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ५६.५० % शाळेत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून १ वेळा केली जाते. ४३.५० % शाळेत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून २ वेळा केली जाते.

बौध्दिक विकासाबरोबरच विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास होणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते. विद्यार्थ्यांचे शरीर निरोगी असल्याशिवाय ते शैक्षणिक प्रगती करू शकणार नाहीत. म्हणून शालेय पातळीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर एखाद्या विद्यार्थ्यांत असलेला आजार संसर्गजन्य अथवा साथीचा असेल तर त्याचा परिणाम इतर विद्यार्थ्यांवर होऊ शकतो, म्हणून विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी महत्त्वाची आहे. असे संशोधकास वाटते.

२०. शालेय इमारतीचा प्रकार दर्शविणारा आलेख.



### ५.०७ भौतिक सुविधा व शालेय परिसर.

प्रश्नावलीच्या सहाव्या भागात लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांत असणाऱ्या भौतिक सुविधा व शालेय परिसर इत्यादीची माहिती जाणून घेण्यासाठी प्रश्न विचारण्यात आले होते. या भागात शालेय इनारत, क्रिडांगण, फर्निचर, पिण्याच्या पाण्याची सोय, शाळेत उपलब्ध असणारे शैक्षणिक साहित्य इ. माहिती जाणून घेणे हा संशोधकाचा उद्देश होता.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ५६ मध्ये शालेय इमारतीबद्दल माहिती जाणून घेणे या उद्देशाने शालेय इमारतीचे स्वरूप व इमारतीची मालकी याविषयी प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.४१ मध्ये देण्यात आलेली आहे.


**कोष्टक क्र. ५.४१**

**शालेय इमारतीच्या प्रकाराबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | पक्की | १०१ | ५०.५० |
| २. | अर्धी पक्की | ६२ | ३१.०० |
| ३. | कच्ची | २९ | १४.५० |
| ४. | टीन शेड | ०८ | ०४.०० |
| ५. | इमारत नाही | ०० | ००.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.४१ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यात असणाऱ्या एकूण माध्यमिक शाळांपैकी ५०.५० % शाळांना शालेय इमारत पक्क्या स्वरूपाची आहे. ३१.०० % शाळांची इमारत अर्धी पक्की अशा स्वरूपाची आहे. १४.५० % शाळा कच्च्या स्वरूपाच्या इमारतीत चालतात तर ०४.००% शाळा टीन शेडमध्ये चालविल्या जातात. इमारतीच्या या स्वरूपाचे अवलोकन केले असता संशोधकास असे वाटते की, सर्व शाळांना पक्की व कायम स्वरूपाची इमारत असणे गरजेचे आहे. शालेय इमारत सर्व बाबींनी परिपूर्ण असेल तरच विद्यार्थ्यांना शाळेविषयी आपुलकी वाटेल. त्यासाठी कच्च्या किंवा टीन शेडच्या इमारतीत शाळा

२१. शालेय इमारतीची मालकी दर्शविणारा आलेख.



चालविणे गैर आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ५६ च्या दुसऱ्या भागात शालेय इमारतीची मालकी जाणून घेण्याबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.४२ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.४२**

**शालेय इमारतीची मालकी.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | संस्थेची स्वतःची | १८१ | ९०.५० |
| २. | भाड्याची | १९ | ०९.५० |
| ३. | इतर | ०० | ००.०० |
| | एकूण. | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.४२ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांच्या इमारतींपैकी ९०.५० % शालेय इमारती या संस्थेच्या स्वतःच्या मालकीच्या आहेत. उर्वरीत ०९.५० % शाळांना स्वतःची इमारत नसून त्या भाड्याच्या इमारतीत चालविल्या जातात. संपूर्ण शाळांना संस्थेची स्वतःची इमारत असणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते. शालेय इमारत शाळांच्या मालकीची नसेल तर सतत इमारत बदलने अशा बाबी घडत राहतात. याचा परिणाम शाळेचा दर्जा व विद्यार्थी संख्या यांचेवरती होतो. असे संशोधकास वाटते. त्यामुळे शालेय इमारत शाळेच्या स्वतःच्या मालकीची असणे आवश्यक आहे. भाड्याच्या इमारतीची रचना ही शाळेस आवश्यक असलेल्या इमारतीच्या स्वरूपात असू शकत नाही. अशा इमारती बऱ्याच वेळा अपुऱ्या व गैरसोयीच्या ठरतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ५७ मध्ये शाळेत उपलब्ध असणाऱ्या वर्गखोल्याविषयी माहिती विचारण्यात आली होती. अशा वर्गखोल्या पुरेशा आहेत काय हे जाणून घेणे हा संशोधकाचा उद्देश होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून या बाबतची प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.४३ मध्ये देण्यात आलेली आहे.

### कोष्टक क्र. ५.४३

### वर्गखोल्यांच्या पुरेशा उपलब्धतेबाबत.

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | १७९ | ८९.५० |
| २. | नाही | २१ | १०.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.४३ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ८९.५० % शाळेत वर्गखोल्यांची उपलब्धता गरजेएवजी आहे. १०.५० % शाळांत वर्गखोल्यांची उपलब्धता अपुऱ्या प्रमाणात आहे. अशा शाळा बऱ्याच ठिकाणी शिफ्टमध्ये चालविल्या जातात. संपूर्ण शाळांना आवश्यक तेवढ्या वर्गखोल्या उपलब्ध असणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते. वर्गखोल्या उपलब्ध नसल्यामुळे जर शिक्षक तास घेऊ शकत नसतील तर त्याचा परिणाम विद्यार्थ्यांवरती होतो, म्हणून सर्व शाळांना योग्य इमारत व पुरेशा वर्गखोल्या उपलब्ध असणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ५८ मध्ये वर्गखोल्यांच्या आकाराबाबत माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांनी संपूर्णपणे आपल्या शाळेतील वर्गखोल्यांचा आकार योग्य असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानकारक वाटली. कारण वर्गखोल्यांचा योग्य आकार, खेळती हवा, स्वच्छ सूर्य प्रकाश इ. बाबींचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होतो.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र ५९ मध्ये शाळेत उपलब्ध असणाऱ्या पुरेशा फर्निचरविषयी माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादक मुख्यध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.४४ मध्ये देण्यात आली आहे.

### कोष्टक क्र. ५.४४

### फर्निचरची उपलब्धता.

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | १७३ | ८६.५० |
| २. | नाही | २७ | १३.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.४४ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ८६.५० % माध्यमिक शाळांमध्ये पुरेसे फर्निचर उपलब्ध आहे. १३.५० % शाळांमध्ये पुरेसे फर्निचर उपलब्ध नाही. ही बाब संशोधकास चिंतेची वाटली. संपूर्ण माध्यमिक शाळांमध्ये पुरेसे फर्निचर उपलब्ध असणे आवश्यक आहे. शाळेस आवश्यक असणारे फर्निचर उपलब्ध नसणे हा शाळेचा मोठा दोष आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ६० मध्ये पिण्याच्या पाण्याची सोय जाणून घेण्याविषयी प्रश्न विचारण्यात आलेला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांनी याबाबतची दिलेली माहिती कोष्ट क्र. ५.४५ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.४५**

**पिण्याच्या पाण्याची सोय.**


| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | २०० | १००.०० |
| २. | नाही | ०० | ००.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.४५ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध आहे ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

ग्रामीण भागातील बहुतेक शाळा गावापासून काहीशा अंतरावरती असतात. अशा शाळांतील विद्यार्थ्यांना शाळेत पिण्याच्या पाण्याची सोय नसेल तर गावात येणे अशक्य होते. म्हणून शाळेच्या ठिकाणी पिण्याच्या सोय उपलब्ध असणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ६१ मध्ये शाळेतील पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेविषयी माहिती विचारण्यात आलेली होती. प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.४६ मध्ये देण्यात आलेली आहे.

२२. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था दर्शविणारा आलेख.



कोष्टक क्र. ५.४६

**पिण्याच्या पाण्याची व्यवस्था.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | हातपंप | ४५ | २२.५० |
| २. | बोअर | ८६ | ४३.०० |
| ३. | विहीर | ०३ | ०१.५० |
| ४. | नळ योजना | ४६ | २३.०० |
| ५. | इतर | २० | १०.०० |
| ६. | काहीही सोय नाही | ०० | ००.०० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.४६ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांपैकी २२.५० % शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय हातपंपाच्या माध्यमातून उपलब्ध आहे. ४३.०० % शाळांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी बोअरची सोय आहे. ०१.५० % शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था विहिरीच्या माध्यमातून केली जाते. २३.०० % शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नळ योजनेद्वारे केलेली आहे. १०.०० % शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय इतर साधनाद्वारे केलेली आहे. संशोधकाने प्रतिसादक मुख्याध्यपकांबरोबर केलेल्या प्रत्यक्ष चर्चेतून असे लक्षात आले की, इतर साधनाद्वारे केलेली सोय ही शेजाऱ्याकडून बोअरचे, विहिरीचे अथवा नळ योजनेचे पाणी घेणे या स्वरूपाची आहे. पिण्याच्या पाण्याची काहीही सोय नसणारी एकही शाळा जिल्ह्यात दिसून आली नाही. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ६२ हा मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र कक्ष असल्याबाबत विचारण्यात आलेला होता. सर्व प्रतिसादक मुख्याध्यापकांनी स्वतंत्र कक्ष असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली. मुख्याध्यापक हा शालेय प्रशासनातील महत्त्वाचा घटक असल्याने व मुख्याध्यापकास अनेक बाबतीत गोपनीय चर्चा करणे आवश्यक असल्याने मुख्याध्यापकास स्वतंत्र कक्ष असणे आवश्यक आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ६३ हा शिक्षकांसाठी स्वतंत्र कक्षाबाबत विचारण्यात

आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांनी याबाबतीत दिलेली माहिती कोष्टक क्र. ५.४७ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.४७**

**शिक्षकांसाठी स्वतंत्र कक्ष.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रनाण |
|---|---|---|---|
| १. | होय | १६७ | ८३.५० |
| २. | नाही | ३३ | १६.५० |
| | एकूण | २०० | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.४७ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ८३.५० % शाळांमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र कक्ष उपलब्ध आहे. १६.५० % शाळांमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र कक्ष उपलब्ध नाही. सर्व शाळांमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र कक्ष उपलब्ध असावा असे संशोधकास वाटते. रिकाम्या तासात शिक्षकांना पुढील तासाच्या अध्यापनांची तयारी करण्यासाठी व अवांतर वाचनासाठी स्वतंत्र कक्ष असणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न ६४ हा शालेय क्रिडांगणाविषयी विचारण्यात आला होता. सर्व प्रतिसादक मुख्याध्यापकांनी शाळेस पुरेसे क्रिडांगण असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली. कारण शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास होणे आवश्यक आहे.

प्रश्नवलीतील प्रश्न क्र. ६५ हा शाळेत उपलब्ध असणाऱ्या क्रिडा साहित्याबद्दल विचारण्यात आला होता. सर्व प्रतिसादक मुख्याध्यापकांनी क्रिडा साहित्य उपलब्ध असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ६६ हा शाळेत उपलब्ध असणाऱ्या इतर शैक्षणिक साहित्यांविषयी विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांनी दिलेली माहिती कोष्टक क्र.५.४८ मध्ये देण्यात आलेली आहे.

कोष्टक क्र. ५.४८

शाळेत उपलब्ध असणारे शैक्षणिक साहित्य.

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | दूरदर्शन संच | ७१ | ३५.५० |
| २. | रेडिओ | २६ | १३.०० |
| ३. | टेप रेकॉर्डर | १३२ | ६६.०० |
| ४. | गणित/भूमिती साहित्य | २०० | १००.०० |
| ५. | विज्ञान प्रयोग शाळा साहित्य | २०० | १००.०० |
| ६. | क्रिडा साहित्य | २०० | १००.०० |
| ७. | भूगोल साहित्य | २०० | १००.०० |
| ८. | इतर | ९३ | ४६.५० |

वरील कोष्टक क्रमांक ५.४८ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ३५.५० % शाळांमध्ये दूरदर्शन संच उपलब्ध आहे. १३.०० % शाळांमध्ये रेडिओ उपलब्ध आहे. ६६.०० % शाळांमध्ये टेप रेकॉर्डर उपलब्ध आहे. १००.०० % शाळांमध्ये गणित/भूमिती साहित्य, विज्ञान प्रयोग शाळा साहित्य, क्रिडा साहित्य व भूगोल साहित्य उपलब्ध आहे. ४६.५० % शाळांमध्ये इतर साहित्य उपलब्ध आहे. इतर साहित्यात संगणक संच, जनरेटर, लाऊड स्पीकर संच, प्रोजेक्टर व शैक्षणिक कॅसेट्स असल्याचे प्रतिसादक मुख्याध्यापकांनी नमूद केले आहे. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली. आजच्या युगात विज्ञानाचा वेगाने विकास होत असल्याने सर्व माध्यमिक शाळांत संगणक असणे अनिवार्य असावे असे संशोधकास वाटते.

### ५.०८ शालेय प्रशासनाच्या बाबतीत मुख्याध्यापकांनी दिलेली इतर माहिती.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ६७ हा शालेय प्रशासनाच्या बाबतीत आवश्यक असणारी व प्रश्नावलीत नमूद न झालेली इतर माहिती मिळविण्यासाठी विचारण्यात आला होता. प्रतिसादक मुख्याध्यापकांनी दिलेली माहिती खालील प्रमाणे आहे. माहितीच्या समोर कंसात दिलेले अंक प्रतिसादक मुख्याध्यापकांची संख्या (वारंवारिता) दर्शवितात.

१. मुख्याध्यापकांना प्रशासनाचे मुक्त स्वातंत्र्य मिळत नाही. (६२)

२. जिल्हा परिषदेकडून मिळणारे वेतनेतर अनुदान वेळेवर मिळत नाही. (१८७)

३. शिक्षकांची वैद्यकीय बिले वेळेवर मिळत नाहीत. (२७)

४. दरवर्षी शालेय तपासणी होत नाही. (१०२)

**समारोप.**

वरील सर्व प्रश्नांचा आढावा घेतल्यानंतर असे दिसून येईल की जिल्ह्यातील माध्यमिक शाळांच्या अनेक समस्या आहेत. मुख्याध्यापकांना स्वातंत्र्य मिळणे गरजेचे आहे; त्याचबरोबर शासनाकडून मिळणारे वेतनेतर अनुदान वेळेवर मिळणे गरजेचे आहे.

**५.०९ - शिक्षण विस्ताराधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती.**

**प्रास्ताविक :**

मुख्याध्यापकांच्या प्रश्नावलीत विचारलेल्या प्रश्नांचे प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून प्राप्त झालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व विशदीकरण यापूर्वी केलेले आहे. शैक्षणिक प्रशासनातील शिक्षण विस्ताराधिकारी हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने त्यांच्यासाठी संशोधकाने प्रश्नावली तयार केली. लातूर जिल्ह्या परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागात एकूण चार शिक्षण विस्ताराधिकारी कार्यरत आहेत. चारही शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांची संशोधकाने प्रतिसादक म्हणून निवड केली. त्यास सर्वांनी प्रतिसाद दिला. प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांच्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व विशदीकरण पुढे करण्यात आल आहे. शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांसाठीची प्रश्नावली परिशिष्ट "क" मध्ये देण्यात आलेली आहे. प्रश्नावलीतील "अ" विभागात अधिकाऱ्याच्या वैयक्तिक माहिती संदर्भात एकूण तीन प्रश्न विचारण्यात आले होते.

प्रश्न क्र. १ हा अधिकाऱ्यांच्या संपूर्ण नावाविषयी होता. विस्ताराधिकाऱ्यांची नावे परिशिष्ट "ग" मध्ये देण्यात आली आहे.

सदरील माहितीवरून शिक्षणविस्ताराधिकाऱ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेतील जाणिव होते. प्रश्नावलीच्या "अ" विभागात शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांच्या नोकरीच्या अनुभवबाबत माहिती विचारण्यात आली होती. त्यात शिक्षक म्हणून अनुभव व विस्ताराधिकारी म्हणून अनुभव असे विभागणी करण्यात आली होती.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २ हा शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेविषयी होता. प्रतिसादकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.४९ मध्ये देण्यात आलेली आहे.

कोष्टक क्र. ५.४९

विस्ताराधिकाऱ्यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता.

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | बी.एस्सी.,बी.एड्. | ०१ | २५.०० |
| २. | बी. एस्सी.,एम. एड्. | ०१ | २५.०० |
| ३. | एम.एस्सी.,बी. एड्. | ०१ | २५.०० |
| ४. | एम. ए., एम. एड्. | ०१ | २५.०० |
| | एकूण | ०४ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.४९ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, केवळ ५० % शिक्षक विस्ताराधिकारी हे पदव्युत्तर पदवी धारण केलेले आहे. तर ५० % शिक्षण विस्ताराधिकारी हे एम.एड्. पदवी प्राप्त आहेत. शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांच्या कामाचे स्वरूप पाहता संशोधकास असे वाटते की, यांना एम्. एड्. पदवी धारण करणे बंधनकारक असले पाहिजे. विस्ताराधिकारी उच्च शिक्षित असल्याशिवाय शालेय तपासणी वस्तूनिष्ठ स्वरूपात होऊ शकणार नाही. असे संशोधकास वाटते. प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३ हा अधिकाऱ्यांच्या नोकरीच्या अनुभवाबाबत होता. प्रतिसादक विस्ताराधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती पुढील प्रमाणे आहे.

चार पैकी श्री. ब्रम्हवाले जी. जी. या शिक्षण विस्ताराधिकाऱ्यास शिक्षक म्हणून ३३ वर्षाचा अनुभव आहे व विस्ताराधिकारी म्हणून ०२ वर्षाचा अनुभव आहे.

सौ. येलूरकर एस्.एस्. यांना शिक्षिका म्हणून २३ वर्षाचा अनुभव आहे व विस्ताराधिकारी म्हणून ०१ वर्षाचा अनुभव आहे.

श्री. काळे बी. एम्. यांना शिक्षक म्हणून १५ वर्षाचा अनुभव आहे व विस्ताराधिकारी म्हणून १० वर्षाचा अनुभव आहे.

श्री. मुरमुरे बी. एन्. यांना शिक्षक म्हणून १२ वर्षाचा अनुभव आहे व विस्ताराधिकारी म्हणून ०८वर्षाचा अनुभव आहे. यावरून असे लक्षात येते की, सर्व शिक्षण विस्ताराधिकाऱ्यंचा शिक्षक म्हणून अनुभव चांगला आहे. ही बाब संशोधकास समाधानकारक वाटली. शिक्षण विस्ताराधिकाऱ्यास शाळेची तपासणी करावी लागत असल्यामुळे त्यास शाळेची संपूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना शिक्षक म्हणून काम करणे आवश्यक आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४ हा शिक्षणाधिकाऱ्यांच्या योग्य मार्गदर्शनाबाबत विचारण्यात आला होता. त्यास सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी शिक्षणधिकारी माध्यमिक यांचे वेळोवेळी व योग्य मार्गदर्शन मिळत असल्याचे नमूद केले.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ५ हा वर्षभरातून कराव्या लागणाऱ्या शाळा तपासणीच्या उद्दिष्टांबाबत होता. प्रतिसादक विस्ताराधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.५० मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.५०**

**शाळा तपासणीच्या वार्षिक उद्दिष्टांबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे. | ०३ | ७५.०० |
| २. | उद्दिष्ट ठरवून दिलेले नाही. | ०१ | २५.०० |
| | एकूण | ०४ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.५० चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, ७५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांचे मत असे आहे की, त्यांच्यासाठी वर्षभरात किती शाळांची तपासणी करावी, हे उद्दिष्ट शासनाने ठरवून दिलेले आहे. २५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांचे मत असे आहे की, वर्षभरात किती शाळा तपासाव्यात हे उद्दिष्ट शासनाने ठरवून दिलेले नाही.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ६ मध्ये दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता होते किंवा नाही? असे विचारण्यात आले होते. प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.५१ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.५१**

**शाळा तपासणीच्या उद्दिष्ट पूर्तीबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ठरवून दिलेले उद्दिष्ट पूर्ण होते. | ०२ | ५०.०० |
| २. | ठरवून दिलेले उद्दिष्ट पूर्ण होते नाही. | ०२ | ५०.०० |
| | एकूण | ०४ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.५१ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, ५० % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांचे मत असे आहे की, शाळा तपासणीचे ठरवून दिलेले उद्दिष्ट पूर्ण होते. ५० % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना हे उद्दिष्ट पूर्ण होत नाही असे वाटते. संशोधकांने शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांबरोबर केलेल्या चर्चेतून असे लक्षात आले की, कामाच्या वाढत्या व्यापामुळे शिक्षण विस्ताराधिकारी वर्षभरात अनेक शाळांची तपासणी करू नाहीत. ती तसीच राहून जाते. ही बाब संशोधकास अत्यंत गंभीर वाटली.

वास्तविक पाहता शाळांची संख्या लक्षात घेऊन शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांच्या संख्येंत वाढ करणे गरजेचे आहे. जेणेकरून जिल्ह्यातील एकाही शाळेची तपासणी शिल्लक राहणार नाही.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ७ मध्ये शाळा तपासणी आपण एकटेच करता की, तपासणी पथकाद्वारे करता? असे विचारले त्यास सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी शाळा तपासणी आपण तपासणीपथकाद्वारे करत असल्याचे नमूद केले.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ८ हा शाळा तपासणीत विषयनिहाय शिक्षकांची तपासणी केली जाते का? असा होता. त्यास सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी अनुकूल प्रतिसाद दिला.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ९ हा तपासणी पथकातील विषयनिहाय तज्ञ सदस्यांबद्दल होता. सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी तपासणी पथकात विषयनिहाय तज्ञ शिक्षक असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली. तपासणी पथकात तज्ञ सदस्य असल्याशिवाय शालेय तपासणी वस्तूनिष्ठ स्वरूपात होऊ शकत नाही, असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १० हा शाळा तपासणीचा अहवाल संबंधित शाळेला देण्याबाबत होता. सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी असा अहवाल संबंधित शाळेस देत असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ११ हा शाळा तपासणीनंतर सर्व शिक्षकांना एकत्र बोलावून त्यांना मार्गदर्शन करण्याविषयी होता. सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी असे मार्गदर्शन करत असल्याचे नमूद केले. ही बाब समाधानकारक आहे. केवळ शाळा तपासणी करण्यापेक्षा तपासणीत दिसून आलेल्या त्रूटी संबंधितांच्या निर्दशनास

आणून देणे गरजेचे आहे. जेणेकरून त्यांना त्या चूका कमी करता येतील. याबाबतीत सर्व शिक्षण विस्ताराधिकारी शाळा तपासणीनंतर शिक्षकांची एकत्रित बैठक बोलावून योग्य असे मार्गदर्शन करतात. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १२ तपासणीत आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी संबंधित शाळेला विशिष्ट कालावधी दिला जातो का? असा होता. सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी असा कालावधी दिला जात असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १३ मध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कोणकोणत्या बाबींची तपासणी केली जाते? असा होता. प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती पुढील प्रमाणे आहे. कंसात दिलेले अंक प्रतिसादकांची संख्या (वारंवारीता) दर्शवितात.

१. जनरल रजिस्टर नोंदी. (०३)

२. नियोजन (०१)

३. सेवापुस्तिका (०३)

४. गोषवारा (०१)

५. कर्मचारी मस्टर (०२)

यावरून असे लक्षात असे लक्षात येते की, सर्व शिक्षण विस्ताराधिकारी सर्व बाबींची तपासणी करत नाहीत. ही बाब संशोधकास गंभीर वाटली. तपासणीत एकवाक्यता व सुसुत्रता असणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न १४ मध्ये कार्यालयीन तपासणी व शैक्षणिक तपासणी एकाच वेळी करता का? असे विचारण्यात आले होते. सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी अशी तपासणी एकाच वेळी करत असल्याचे नमूद केले. कार्यालयीन व शैक्षणिक तपासणी एकाच वेळी करणे उचित नाही. असे संशोधकास वाटते, कारण दोन्ही तपासणी एकाच वेळी केल्याने त्या अचूक व परिपूर्ण स्वरूपात होऊ शकत नाहीत. त्यासाठी दोन्ही तपासणी स्वतंत्र स्वरूपात करण्यात याव्यात. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १५ हा कार्यालयीन तपासणीत आपण कोणकोणती अभिलेखे तपासता? असा होता. प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांकडून प्राप्त

झालेली माहिती पुढील प्रमाणे आहे. कंसातील अंक प्रतिसादकांची संख्या (वारंवारिता) दर्शवितात.

१. प्रवेश निर्गम रजिस्टर (०२)

२. कर्मचाऱ्यांची वैयक्तिक फाईल (०४)

३. कॅश बुक (०३)

४. सी.ए. रिपोर्ट ( ०३)

५. किर्द (०३)

६. विभागवार रजिस्टर्स (०२)

७. बुक बँक (०२)

८. इ.बी.सी. (०१)

वरील माहिती वरून असे लक्षात येते की, सर्व शिक्षण विस्ताराधिकारी सर्व बाबी तपासत नाहीत. ही बाब गंभीर आहे, असे संशोधकास वाटते. शालेय तपासणी वस्तूनिष्ठ स्वरूपात होण्यासाठी शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना तपासणीसाठीचा आराखडा देणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १६ हा शिक्षक मान्यता देण्यासंदर्भात शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांच्या कर्तव्यांबाबत होता. प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.५२ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.५२**

**शिक्षक मान्यता देण्यात विस्ताराधिकाऱ्यांचा कर्तव्याबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०३ | ७५.०० |
| २. | नाही | ०१ | २५.०० |
| | एकूण | ०४ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.५२ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, ७५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना असे वाटते की, शिक्षकांच्या मान्यता देण्यात आपले कर्तव्य आहे. २५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना असे वाटते की, शिक्षकांच्या मान्यता देण्यात आपले कर्तव्य नाही.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १७ हा महिनाभरात किती शाळांची तपासणी करावी याविषयी ठरवून दिलेल्या उद्दिष्टांबाबत होता. सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी असे उद्दिष्ट ठरवून दिले असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १८ हा मुख्यालयात थांबणे बंधनकारक असल्याविषयी होता. याबाबतीत सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी आठवड्यांतून एक दिवस (सोमवार) मुख्यालयात थांबणे बंधनकारक असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानकारक वाटली. पंरतु प्रत्यक्षात अनेक वेळा कार्यालयीन कामासाठी विस्ताराधिकारी ठरवून दिलेल्या दिवशी देखील मुख्यालयात नसतात. ही बाब गंभीर आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १९ हा शालेय तपासणीच्या कालावधीबद्दल होता. प्राप्त माहिती कोष्टक क्र. ५.५३ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.५३**

**शाळा तपासणीच्या कालावधीबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | कालावधी पुरेसा आहे. | ०१ | २५.०० |
| २. | कालावधी पुरेसा नाही. | ०३ | ७५.०० |
| | एकूण | ०४ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.५३ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, २५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना उपलब्ध कालावधी शाळा तपासण्यासाठी पुरेसा वाटतो. ७५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना हा कालावधी अपुरा वाटतो.

जिल्ह्यातील वाढत्या शाळांची संख्या लक्षात घेवून शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांच्या संख्येत वाढ करणे गरजेचे आहे. जेणेकरून शालेय तपासणी वेळेत व वस्तूनिष्ठ होईल असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २० हा विद्यार्थी प्रवेशांचे अधिकार आपणांस आहेत काय? असा होता. याबाबतीत प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.५४ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.५४**

**विद्यार्थी प्रेवशाच्या अधिकाराबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०१ | २५.०० |
| २. | नाही | ०३ | ७५.०० |
| | एकूण | ०४ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.५४ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, २५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना असे वाटते की, विद्यार्थी प्रवेशांचे अधिकार आपणास नाहीत. ७५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी हे अधिकार आपणांस असल्याचे नमूद केले आहे.

वास्तविक पाहता विद्यार्थी प्रवेशांच्याबाबतीत संपूर्ण शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांमध्ये एकवाक्यता असणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते. त्यासाठी त्यांना याबाबतीत वरीष्ठांचे मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न २१ हा विद्यार्थी प्रवेश नियमानुसार झाल्याची खात्री करणेबाबत होता. याबाबतीत प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी दिलेली माहिती कोष्टक क्र. ५.५५ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.५५**

**विद्यार्थी प्रवेश नियमानुसार केल्याच्या तपासणीबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०३ | ७५.०० |
| २. | नाही | ०१ | २५.०० |
| | एकूण | ०४ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.५५ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, ७५ % शिक्षण विस्ताराधिकारी विद्यार्थी प्रवेश नियमानुसार झाले असल्याची खात्री व तपासणी करतात. २५ % शिक्षण विस्ताराधिकारी याबाबतची तपासणी करत नाही. याबाबतची सर्व तपासणी शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांमार्फत केली जाणे गरजेचे आहे असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २२ हा मा.शा.संहिता ५६.०४ नुसार देण्यात आलेल्या प्रवेशाच्या बाबतीत होता. प्राप्त माहिती कोष्टक क्र. ५.५६ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.५६**

**मा.शा.संहिता ५६.४ नुसार देण्यात आलेल्या प्रवेशाबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | असे प्रवेश कार्यभारासाठी मान्य केले जात नाहीत. | ०२ | ५०.०० |
| २. | असे प्रवेश कार्यभारासाठी मान्य केले जातात. | ०२ | ५०.०० |
| | एकूण | ०४ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.५६ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, ५० % शिक्षण विस्ताराधिकारी माध्यमिक शाळा संहिता ५६.४ नुसार देण्यात आलेले प्रवेश कार्यभारासाठी मान्य करतात. तर ५० % शिक्षण विस्ताराधिकारी असे प्रवेश कार्यभारासाठी मान्य करत नाहीत. याबाबतीत सर्व शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांत एकवाक्यता नाही. ही बाब संशोधकास असमाधानकारक वाटली.

वास्तविक पाहता अशा बाबतीत शासन नियमावलीचा अभ्यास करून सर्व शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांत एक वाक्यता असणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २३ हा माध्यमिक शिक्षण विभागामार्फत घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षांविषयी होता. त्यास १०० % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी अशा परीक्षा घेत असल्याचे नमुद केले.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २४ मध्ये कोणकोणत्या परीक्षा घेतल्या जातात? असे विचारण्यात आले होते. प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी दिलेली माहिती खालील प्रमाणे आहे. कंसातील अंक प्रतिसादकांची संख्या (वारंवारीता) दर्शवितात.

१. विज्ञान मंच (०३)

२. विज्ञान मेळावे (०२)

३. राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा (०४)

४. शिष्यवृत्ती परीक्षा (०३)

५. वाणिज्य प्रमाण पत्र (टंकलेखन) परीक्षा (०३)

६. चित्रकला परीक्षा (०२)

७. निवोदय प्रवेश परीक्षा (०३)

वरील माहिती वरून असे लक्षात येते की, लातूर जिल्हा परीक्षदेच्या माध्यमिक शिक्षण विभागामार्फत विविध परीक्षांचे आयोजन केले जाते. संशोधकाच्या मते विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकाससाठी अशा परीक्षांची गरज आहे. अशा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कला गुणांना वाव मिळतो व त्यांचा विकास होतो.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २५ हा विना-अनुदीत शाळा अनुदानावर आणन्यासाठीच्या तपासणीबाबत विचारण्यात आला होता. सर्व शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी अशी तपासणी आपण करत असल्याचे नमूद केले.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २६ हा नविन शाळा मान्यता संदर्भात विचारण्यात आला होता. प्राप्त माहिती कोष्टक क्र.५.५७ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.५७**

**नवीन शाळा मान्यता संदर्भात विस्ताराधिकाऱ्याची शिफारस.**

| अनु क्र. | प्रतिसादांचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | गरजेची आहे. | ०२ | ५०.०० |
| २. | गरजेची नाही | ०२ | ५०.०० |
| | एकूण | ०४ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.५७ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, ५० % शिक्षण विस्ताराधिकारी यांना असे वाटते की, नविन शाळा मान्यतेसाठी शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांची शिफारस गरजेची आहे. ५० % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना असे वाटते की, नविन शाळा मान्यतेसाठी शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांची शिफारस गरजेची नाही. वास्तविक पाहता सर्व शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनध्ये याबाबतीत एकवाक्यता असली पाहिजे. असे संशोधकास वाटते. नविन शाळा मान्यते संदर्भात पाहणी करण्याचे काम शिक्षण विस्ताराधिकारी करत असल्याणे योग्य त्या संस्थेस नविन शाळा देण्यास हरकत नाही, अशी शिफारस ते वरीष्ठांकडे प्रस्तावित करतात. त्यामुळे त्यांच्या उत्तरात एकवाक्यता असावी. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न २७ हा शाळांना दिली जाणारी वेतनेतर अनुदाने नियमानुसार असल्याच्या खात्रीबाबत होता. प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.५८ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.५८**

**शाळांच्या वेतनेतर अनुदानाच्या खात्रीबाबत**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | खात्री करतो | ०३ | ७५.०० |
| २. | खात्री करत नाही | ०१ | २५.०० |
| | एकूण | ०४ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.५८ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ७५ % शिक्षण विस्ताराधिकारी शाळांना मिळालेले वेतनेतर अनुदान नियमानुसार दिले गेलेले आहे किंवा नाही, याची खात्री करतात. २५ % शिक्षण विस्ताराधिकारी याची खात्री करत नाही. बऱ्याच वेळा शासनाकडून मिळणारे अनुदान नजर चूकीचे अधिक किंवा कमी दिले जाण्याची शक्यता असते. त्यामुळे दिलेल अनुदान योग्य आहे किंवा नाही याची शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी खात्री करणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २८ हा विद्यार्थ्यांसंदर्भातील विविध अभिलेखांच्या तपासणीबाबत विचारण्यात आला होता. प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती पुढील प्रमाणे आहे. कंसातील अंक प्रतिसादकांची संख्या (वारंवारीता) दर्शवितात.

१. प्रवेश निर्गम (०४)

२. विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती (०३)

३. परीक्षा रजिस्टर (०३)

४. गृहकार्याच्या नोंदी (०२)

५. आरोग्य जपासणी (०४)

विद्यार्थ्यांच्या बाबतीत वरील सर्व अभिलेखे अत्यंत महत्त्वाचे असल्याणे त्यांची तपासणी सर्व शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी वस्तूनिष्ठपणे करणे गरजेचे आहे, असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. २९, सदरील अभिलेखे शाळां नियमानुसार ठेवतात, यांची खात्री करता का? असा विचारण्यात आला होता. सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी आपण याची खात्री करत असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३० हा शासनाकडून मिळालेले वेतनेतर अनुदान शाळा योग्य बाबींवर खर्च करतात का? असा विचारण्यात आला होता. प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.५९ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.५९**

**वेतनेतर अनुदानांच्या नियमानुसार खर्चाबाबत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | नियमानुसार खर्च होतो | ०१ | २५.०० |
| २. | नियमानुसार खर्च होत नाही | ०३ | ७५.०० |
| | एकूण | ०४ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.५९ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील २५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना असे वाटते की, शाळांना मिळणारे वेतनेतर अनुदान शाळा नियमानुसार खर्च करतात. ७५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांना असे वाटते कीं, शाळांना मिळणारे वेतनेतर अनुदान शाळा नियमानुसार खर्च करत नाही. ही बाब गंभीर आहे, असे संशोधकास वाटते. शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन वेतनाबरोबरच वेतनेतर अनुदान देते. या अनुदानातून शाळांची भौतिक प्रगती व्हावी, ग्रंथालय सुसज्ज व्हावे व या सर्व बाबींचा फायदा विद्यार्थ्यांना व्हावा असे शासनास वाटते, म्हणून असे वेतनेतर अनुदान शाळां नियमानुसार खर्च करत नसतील तर अशा शाळांवर कठोर कार्यवाही करणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३१ हा वेतनेतर अनुदानाच्या पडताळणीबाबत होता. ७५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी अशी पडताळणी करत असल्याचे नमूद केले. २५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी अशी पडताळणी आपण करत नसल्याचे सांगीतले. सर्व शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी अशी पडताळणी करणे गरजेचे आहे असे संशोधकास वाटले.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३२ हा वेतनेतर अनुदान नियमानुसार खर्च न करण्याऱ्याबाबत

होता. ७५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी अशा शाळा निर्देशनास आल्याचे सांगीतले. त्याचबरोबर अशा शाळांबाबत योग्य ती कार्यवाही वरीष्ठांकडे प्रस्ताविक केल्याचे सांगितले. २५ % शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी अशी शाळा निदर्शनास आली नसल्याचे नमूद केले. ज्या शाळा वेतनेतर अनुदान नियमानुसार खर्च करत नाहीत, अशा शाळांना शासनामार्फत कठोर कार्यवाहीची गरज आहे असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३५ हा शालेय समितीच्या आवश्यकेतेबाबत विचारण्यात आला होता. सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी शालेय समितीची आवश्यकता असल्याचे नमूद केले.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३६ मध्ये शाळा तपासणीत शाळांनी पुरवीलेली माहिती सत्य असल्याची खात्री करून घेण्याबाबत होता. सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी अशी खात्री करून घेत असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

प्रश्नावलीतील प्रश्न ३७ हा शिक्षक अनुशेषाबाबत विचारण्यात आला होता. सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी शाळा अनुशेषाच्या अधिन राहून कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करत असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ३८ हा गुणवता वाढीसाठी शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासंदर्भात विचारण्यात आला होता. सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी असे मार्गदर्शन करत असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास अत्यंत समाधानाची वाटली.

प्रश्नावलीतील प्रश्न ३९ व ४० शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाबाबत विचारण्यात आला होता. सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी अशा प्रशिक्षणाची तरतूद असल्याचे व गरज असल्याचे नमूद केले.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ४१ हा शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांच्या कार्याभाराविषयी विचारण्यात आला होता. याबाबतीत सर्व प्रतिसादक शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांनी आपला कार्यभार जास्तीचा असल्याचे नमूद केले. जिल्ह्यात ४७४ माध्यमिक शाळा आहेत व केवळ ४ शिक्षण विस्ताराधिकारी आहेत. सर्व शाळांची वस्तूनिष्ठ तपासणी करण्यासाठी किमान ५० शाळांमागे १ शिक्षण विस्ताराधिकारी असावा असे मत सर्व प्रतिसादकांनी नमूद केले. यावरून संशोधकास असे वाटते की, शिक्षण विस्ताराधिकाऱ्यांच्या संख्येत वाढ करणे गरजेचे आहे. अन्यथा शालेय तपासणी वस्तूनिष्ठ स्वरूपात होणार नाही किंवा वर्षभरात संपूर्ण शाळांची तपासणी शक्य होणार नाही.

## ५.१० - गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखतीतून मिळालेली माहिती.

संशोधकाने लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या प्रशासकीय समस्यांचा अभ्यास करण्याचे निश्चित केल्यानंतर लातूर जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांच्या प्रशासकीय समस्यांचा अभ्यास करण्याचे ठरविले. गटशिक्षणाधिकारी हा तालुक्यातील शैक्षणिक प्रशासनाचा प्रमुख असल्याने तालुका पातळीवर त्यांच्या अनेक जबाबदाऱ्या आहेत. हे संशोधकाच्या लक्षात आले.

लातूर जिल्ह्यात एकूण १० तालुक्यांचा समावेश आहे. प्रत्येक तालुक्यास स्वतंत्र गटशिक्षणाधिकारी कार्यरत आहे. त्या सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांची संशोधकाने संशोधन कार्यासाठी प्रतिसादक म्हणून निवड केली. त्यापैकी ०६ गट शिक्षणाधिकाऱ्यांनी मुलाखतीस योग्य वेळेत प्रतिसाद दिला. गटशिक्षणाधिकाऱ्यांची मुलाखत घेण्यापूर्वी त्यांच्या मुलाखतीची प्रश्नसूची मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाने तयार केली. गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीची प्रश्नसूची परिशिष्ट "ड" मध्ये देण्यात आलेली आहे. मुलाखतीतून मिळलेल्या माहितीचे विशदीकरण पुढील प्रमाणे करण्यात येत आहे. मुलाखतीच्या प्रश्नसूचित प्रश्न क्र. १ अधिकाऱ्याचे संपूर्ण नाव, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता व गटशिक्षणाधिकारी म्हणून अनुभव याबाबत विचारण्यात आला होता. याबाबतची प्राप्त माहिती कोष्टक क्र. ५.६१ मध्ये देण्यात आली आहे.

**कोष्टक क्र. ५.६०**

**गटशिक्षणाधिकाऱ्यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता.**

| अनु क्र. | प्रतिसादाकाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | बी.ए., बी.एड्. | ०२ | ३३.३३ |
| २. | एम्. ए., बी.एड्. | ०२ | ३३.३३ |
| ३. | एम्.ए., एम.एड् | ०१ | १६.६७ |
| ४. | बी.एस्सी., बी. एड्. | ०१ | १६.६७ |
| | एकूण | ०६ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.६० चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की,

लातूर जिल्ह्यातील ३३.३३ % गटशिक्षणाधिकारी यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता बी. ए.,बी.एड्. अशी आहे. ३३.३३ % गटशिक्षणाधिकारी यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता एम्.ए.,बी.एड्. अशी आहे. १६.६७ % गटशिक्षणाधिकारी यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता एम्.ए,एम्.एड्. अशी आहे. १६.६७ % गटशिक्षणाधिकारी यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता बी.एस्सी.,बी.एड्. अशी आहे.

यावरून असे लक्षात येते की, सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता समाधानकारक आहे. मुलाखतीतील प्रश्न क्र. १ च्या भागात गटशिक्षणाधिकारी म्हणून अनुभवाबाबत माहिती विचारण्यात आली होती. प्रतिसादकांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.६२ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.६१**

**गटशिक्षणाधिकाऱ्यांचा प्रशासन अनुभव.**

| अनु क्र. | प्रतिसादाकाचे स्वरूप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ५ वर्षापेक्षा कमी | ०२ | ३३.३३ |
| २. | ५ ते १० वर्ष | ०४ | ६६.६७ |
| | एकूण | ०६ | १००.०० |

वरील कोष्टक क्र. ५.६२ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, लातूर जिल्ह्यातील ३३.३३ % गटशिक्षणाधिकारी यांचा गटशिक्षणाधिकारी म्हणून अनुभव ५ वर्षांपेक्षा कमी आहे. ६६.६७ % गटशिक्षणाधिकारी यांचा गटशिक्षणाधिकारी म्हणून अनुभव ५ ते १० वर्षांचा आहे. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली. प्रशासनामध्ये प्रशासकीयपदाचा अनुभव जेवढा जास्त असेल तेवढी प्रशासकाच्या कामात निपुनता येते. जिल्ह्यात अनुभवी गटशिक्षणाधिकाऱ्यांची संख्या चांगली असल्याचे पाहून संशोधकास समाधान वाटले.

प्रश्नसूचीतील प्रश्न क्र. ०२ हा गटशिक्षणाधिकारी म्हणून माध्यमिक शाळाबाबतची कोणकोणती कामे आपणांस करावी लागतात? हा होता. याबाबतची प्रतिसादकांकडून प्राप्त झालेली माहिती पुढील प्रमाणे आहे. कंसातील अंक प्रतिसादकांची संख्या (वारंवारीता) दर्शवितात.

१. शालेय तपासणी. (०६)

२. मंडळ मान्यता वर्धित करगे तपासणी (०६)

३. पटपडताळणी (०६)

४. मंडळ परीक्षा नियंत्रण (०६)

वरील बार्बीवरून असे लक्षात येते की, गटशिक्षणाधिकाऱ्यास माध्यमिक शाळांच्या बाबतीत सर्व कामे करावी लागतात, परंतु ही सर्व कामे शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्या मार्गदर्शनानुसार असतात. या ठराविक कामांव्यतिरिक्त शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी वेळोवळी सांगितलेली इतर प्रशासकीय कामे देखील गटशिक्षणाधिकाऱ्यांना करावी लागतात. यावरून संशोधकाच्या असे लक्षात आले की, गटशिक्षणाधिकारी हा तालुका पातळीवरील प्रमुख शैक्षणिक प्रशासक आहे.

मुलाखतीतील प्रश्न ३ हा शाळा तपासणीत आपण कोणकोणत्या बाबी तपासता? असा विचारण्यात आला होता. याबाबतची प्रतिसादकांकडून प्राप्त झालेली माहिती पुढील प्रमाणे आहे. कंसात दिलेले अंक प्रतिसादकांची संख्या (वारंवारीता) दर्शवितात.

१. प्रवेश निर्गम (०६)

२. ग्रंथालय (०६)

३. प्रयोगशाळा (०५)

४. अभ्यास क्रमाचे आयोज नियोजन (०४)

५. परिक्षा विभाग (०५)

६. शिष्यवृत्ती परीक्षा नोंद (०४)

७. शालेय शिक्षण समिती (०६)

८. शिक्षक-पालक संघ (०६)

यावरून संशोधकास असे वाटते की, गटशिक्षणाधिकाऱ्यांकडून आपल्या तालुक्यातील सर्व शाळांची वस्तूनिष्ठपणे तपासणी केली जाते. सविस्तर चर्चेतून संशोधकाच्या असे लक्षात आले की, ग्रामीण भागातील शाळांची परिस्थिती ग्रंथालयाच्या बाबतीत दयनीय आहे. अनेक शाळांना शिष्यवृत्ती परीक्षेत रस नाही, तर अनेक शाळांमधून अभ्यासक्रमाचे आयोज्न-नियोजन योग्यरीत्या केले जात नाही. ही बाब संशोधकास चिंतेची वाटली.

मुलाखतीतील प्रश्न क्र. ४ हा जिल्हा परिषदेमार्फत विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या इतर शैक्षणिक उपक्रमांविषयी विचारण्यात आला होता. त्यास सर्व प्रतिसादकांनी

खालील उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले.

१. विज्ञान मंच /विज्ञान मेळावे.

२. निवोदय प्रवेश परिक्षा.

३. आरोग्य तपासणी उपक्रम.

४. स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन.

५. चित्रकला स्पर्धा.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ५ हा शाळेचा आर्थिक कारभार आपण तपासता का ? असा विचारण्यात आला होता. सर्व प्रतिसादक गटशिक्षणाधिकाऱ्यांनी शाळेचा आर्थिक कारभार तपासत असल्याचे सांगितले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

मुलाखतीतील प्रश्न क्र. ६ हा नियमानुसार विद्यार्थी प्रवेश न देण्याऱ्या शाळांबाबत आपण कोणती कार्यवाही करता? असा विचारण्यात आला होता. सर्व प्रतिसादक गटशिक्षगाधिकाऱ्यांनी याबाबतीत आपण कोणतीही कार्यवाही करत नसून ही बाब वरिष्ठांकडे प्रस्थापित करतो. असे सांगितले.

मुलाखतीतील प्रश्न क्र. ७ हा शाळांच्या इमारतीबाबत विचारण्यात आला होता. प्रतिसादक गटशिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेली माहिती कोष्टक क्र. ५.६३ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.६२**

**शाळा इमारतीबाबत गटशिक्षणाधिकाऱ्यांचे मत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १. | कच्ची इमारत | ५०.०० |
| २. | अर्धी पक्की इमारत | १५.०० |
| ३. | पक्की इमारत | ३५.०० |
| | एकूण | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.६३ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मते लातूर जिल्ह्यात ५० % शाळांच्या इमारती या कच्च्या स्वरूपाच्या आहेत. १५ % शाळांच्या इमारती या अर्धी पक्की या स्वरूपाच्या आहेत. ३५ % शाळांच्या इमारती या पक्क्या स्वरूपाच्या आहेत. ही बाब संशोधकास चिंतेती

वाटली. गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मते पक्क्या इमारतीचे प्रमाण प्रामुख्याने शहरी भागात अधिक आहे. कच्च्या इमारतीचे प्रमाण ग्रामीण भागात अधिक आहे. ग्रामीण भागातील अनेक शाळांना इमारती नसून त्या पत्र्याच्या शेडमध्ये चालविल्या जातात. ही बाब संशोधकास चिंतेती वाटली. वास्तविक पाहता शाळेच्या सर्वांगिण विकासात शालेय इमारत हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. असे संशोधकास वाटते.

मुलाखतीतील प्रश्न क्र. ८ हा वर्षभरात आपण किती माध्यमिक शाळांचे तपासणी करावी हे उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे काय? दिले असल्यास ते पूर्ण होते काय? असा विचारण्यात आला होता. याबाबतीत सर्व प्रतिसादक गटशिक्षणाधिकाऱ्यांनी असे उद्दिष्ट ठरवून दिले असल्याचे सांगितले. परंतु शाळांची संख्या अधिक असल्याने हे उद्दिष्ट पूर्ण होणे कठिण आहे. असे मत नमूद केले. यावरून संशोधकास असे वाटते की, शाळांच्या संख्येच्या प्रमाणात शाळां तपासणीसांची नियुक्ती करणे गरजेचे आहे. असे न झाल्यास शालेय तपासणी ही केवळ काम पूर्ण करण्यासाठी केली जाईल. अशा तपासणीस अर्थ प्राप्त राहणार नाही.

मुलाखतीतील प्रश्न क्र. ९ हा शाळांतपासणीनंतर आपण विषयनिहाय शिक्षकांना मार्गदर्शन करता का? असा विचारण्यात आला होता. याबाबतीत सर्व प्रतिसादक गटशिक्षणाधिकाऱ्यांनी असे मार्गदर्शन आपण करत नाहीत. कारण सर्व विषयांच्याबाबत आपणास माहिती असू शकत नाही. त्यासाठी शिक्षकांचे विषयनिहाय उद्‌बोधन वर्ग जिल्हा परिषदेमार्फत आयोजित केले जात असल्याचे सांगितले. यावरून संशोधकास असे वाटते की, शाळा तपासणी पथकात विषयनिहाय तज्ञ सदस्यांचा समावेश असणे गरजेचे आहे. अन्यथा शालेय तपासणी वस्तूनिष्ठ स्वरूपात होणार नाही.

मुलाखतीतील प्रश्न क्र. १० हा माध्यमिक शाळांतील कर्मचाऱ्यांच्या मान्यता आपण देता का? असा विचारण्यात आला होता. सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांनी अशा मान्यता आपण देत नसून त्या जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्याकडून दिल्या जातात, असे सांगितले. यावरून असे लक्षात येते की, माध्यमिक शाळेतील कर्मचाऱ्यांच्या मान्यतेचे अधिकार गटशिक्षणाधिकाऱ्यांस नाहीत.

मुलाखतीतील प्रश्न क्र. ११ हा तालुक्यातील नविन माध्यमिक शाळांना आपण मान्यता देता का? असा विचारण्यात आला होता. सर्व प्रतिसादक गटशिक्षणाधिकाऱ्यांनी अशी मान्यता आपण देत नसल्याचे सांगितले.

मुलाखतीतील प्रश्न क्र. १२ हा शाळांच्या मुख्याध्यापकांचे पद सेवा जेष्ठतेनुसार भरणे आपणांस योग्य वाटते का ? असा विचारण्यात आला होता. याबाबतीत प्रतिसादकाकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.६४ मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.६३**

**मुख्याध्यापक नेमणूकीबाबत गटशिक्षणाधिकाऱ्यांचे मत.**

| अनु क्र. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | नेमणूक सेवा जेष्ठतेनुसार करणे योग्य आहे. | ०५ | ८३.३३ |
| २. | नेमणूक सेवा जेष्ठतेनुसार करणे योग्य नाही. | ०१ | १६.६७ |
| | एकूण | ०६ | १००.०० |

वरील कोष्टक क्रमांक ५.६४ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, ८३.३३ % गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मते मुख्याध्यापकांचे पद सेवा जेष्ठतेनुसार भरणे योग्य आहे. १६.६७ % गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मते मुख्याध्यापकांचे पद सेवा जेष्ठतेनुसार भरणे उचित नाही. यावरून संशोधकास असे वाटते की, मुख्याध्यापक पद भरणे बाबत गटशिक्षणाधिकाऱ्यांत एकमत नाही. संशोधकाच्या मते शालेय पातळीवरील मुख्याध्यापक हा प्रमुख प्रशासक असल्याणे त्यास अनुभवाची नितांत गरज आहे.

मुलाखतीतील प्रश्न क्र. १३ हा आपणांस माध्यमिक शाळांबाबत कोणकोणत्या बैठकीस हजर राहावे लागते? असा विचारण्यात आला होता. सर्व प्रतिसादक गटशिक्षणाधिकाऱ्यांकडून मिळालेली माहिती पुढील प्रमाणे.

१. शालेय तपासणीबाबत बैठक.

२. मंडळ परीक्षाबाबत बैठक.

३. शिक्षणाधिकारी मा. यांनी बोलाविलेल्या इतर बैठका.

वरील सर्व बैठकीस आपणांस हजर रहावे लागत असल्याचे सर्व प्रतिसादक गटशिक्षणाधिकाऱ्यांनी सांगितले.

मुलाखतीतील प्रश्न क्र. १४ हा आपल्या तालुक्यातील माध्यमिक शाळांच्या शैक्षणिक दर्जाविषयी आपले मत काय? असा विचारण्यात आला होता. याबाबतीत सर्व प्रतिसादक गटशिक्षणाधिकाऱ्यांनी शहरी भागातील माध्यमिक शाळांचा शैक्षणिक दर्जा उत्तम असल्याचे सांगितले. त्याचबरोबर ग्रामीण भागातील काही निवडक शाळा देखील आपला शैक्षणिक दर्जा ठिकवून असल्याचे मत नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

मुलाखतीतील प्रश्न क्र. १५ हा गटशिक्षणाधिकारी म्हणून आपणांस असलेला कार्यभार योग्य आहे का? असा विचारण्यात आला होता. याबाबत ५० % गटशिक्षणाधिकाऱ्यांनी हा कार्यभार योग्य व पुरेसा असल्याचे नमूद केले. ५० % गटशिक्षणाधिकाऱ्यांनी हा कार्यभार ज्यादा आहे असे नमूद केले. संशोधकांनी प्रतिसादकांबरोबर केलेल्या चर्चेतून असे लक्षात आले की, कार्यभार ज्यादा आहे, असे मत नमूद करण्याऱ्या गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या तालुक्यात शाळांची संख्या जास्त आहे. कार्यभार योग्य पुरेसा आहे, असे मत नमूद करणाऱ्या गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या तालुक्यात शाळांची संख्या कमी आहे.

याशिवाय गटशिक्षणाधिकारी म्हणून माध्यमिक शाळांबाबत आपणास काही विशेष जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात काय? असे विचारले असता स्वतंत्र व विशेष जबाबदाऱ्या नसल्याचे सर्व प्रतिसादकांनी नमूद केले.

**५.११ - उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखतीतून मिळालेली माहिती.**

**प्रास्ताविक :-**

उपशिक्षणाधिकारी हा शालेय प्रशासनातील अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने संशोधकाने संशोधन कार्यास आवश्यक असणारी माहिती मिळविण्यासाठी त्यांची नुलाखत घेण्याचे निश्चित केले. मार्गदर्शकाकडून सुरूवातीस मुलाखतीसाठीची प्रश्नसूची तयार केली. उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखतीची प्रश्नसूची परिशिष्ट "इ" मध्ये देण्यात आलेली आहे. लातूर जिल्हा परिषदेत एकूण दोन उपशिक्षणाधिकारी कार्यरत आहेत.

दोन्ही उपशिक्षणाधिकाऱ्यांची संशोधकांने प्रतिसादक म्हणून निवड केली. त्यास दोघांचाही प्रतिसादक प्राप्त झाला.

प्रश्न क्र. १ हा अधिकाऱ्याचे नाव व त्यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेविषयी होता. प्रश्न क्र. २ हा अनुभवाविषयी होता. प्रतिसादककांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र. ५.६० मध्ये देण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. ५.६४**

**उपशिक्षणाधिकाऱ्यांची शै.व व्यावसायिक पात्रता.**

| अनु क्र. | उपशिक्षणाधिकारी | शै. व व्यावसायिक पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|
| १. | श्री. चंदनशिवे एस्. व्ही. | एम.एस्सी.,बी.एड् | १० वर्ष |
| २. | श्री. मोरे डी. ए. | बी.ए., बी.एड् | १२ वर्ष |

वरील कोष्टक क्रमांक ५.६० चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, उपशिक्षणाधिकारी क्र. १ यांना उपशिक्षणाधिकारी म्हणून १० वर्षाचा अनुभव आहे. तर उपशिक्षणाधिकारी क्र. २ यांना उपशिक्षणाधिकारी म्हणून १२ वर्षाचा अनुभव आहे. दोन्ही उपशिक्षणाधिकाऱ्यांना पदाचा अनुभव दीर्घ असल्याने त्यांच्या शाळा तपासणीत वस्तूनिष्ठपणा येणे सहाजिक आहे. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

प्रश्न क्र. २ हा त्यांच्या कर्तव्याच्या लेखी व निश्चित स्वरूपाच्या नोंदीविषयी होता दोन्ही उपशिक्षणाधिकाऱ्यांनी आपल्या कर्तव्यांबाबत लिखित स्वरूपात नोंद असल्याचे नमूद केले.

प्रश्न क्र. ३ हा शालेय तपासणीत आपण कोणकोणती अभिलेखे तपासता? असे विचारले होते. प्रतिसादकाकडून प्राप्त झालेली माहिती पुढील प्रमाणे आहे. कंसातील अंक प्रतिसादकांची संख्या (वारंवारीता) दर्शवितात.

१. प्रवेश फॉर्म (०२)
२. टि. सी. बुक (०२)
३. शिक्षक हजेरी (०२)
४. विद्यार्थी हजेरी (०२)
५. लॉक बुक (०२)
६. स्टॉक रजिस्टर (०२)

७. सेवा पुस्तिका (०२)
८. कॅश बुक (०२)
९. आरोग्य तपासणी अहवाल (०२)
१०. शालेय पोषण आहार (०२)
११. वार्षिक निकाल (०२)
१२. उत्तर पत्रिका (०२)
१३. शिक्षक-पालक संघ इ. (०२)

वरील माहिती वरून असे लक्षात येते की, दोन्ही उपशिक्षणाधिकारी सर्व बाबीची शालेय तपासणी वस्तूनिष्ठपणे करतात. ही बाब संशोधकास अत्यंत समाधानाची वाटली.

प्रश्न क्र. ४ हा शाळा तपासणीच्या ठरवून दिलेल्या उद्दिष्टांबाबत विचारण्यात आला होता. दोन्ही प्रतिसादकांनी वर्षातून एक वेळा शाळेची तपासणी करण्याचे उद्दिष्ट ठरवून दिले असल्याचे सांगितले. दोघांच्या विचारातील एकवाक्यतेबाबत संशोधकास समाधान वाटले.

प्रश्न क्र. ५ मुख्यालयात विशिष्ट दिवशी थांबणे बंधनकारक आहे का? हा प्रश्न विचारण्यात आला होता. दोन्ही उपशिक्षणाधिकाऱ्यांनी सोमवार व मंगळवार असे आठवड्यातील दोन दिवस मुख्यालयात थांबणे बंधनकारक असल्याचे सांगितले. प्रत्यक्ष चर्चेतून संशोधकाच्या असे लक्षात आले की, कार्यालयीन कामाच्या इतर व्यापामुळे त्यांना आठवड्यातील दोन दिवस मुख्यालयात थांबणे शक्य होत नाही. ही बाब संशोधकास गंभीर वाटली.

प्रश्न क्र. ६ हा शिक्षक, पालक, संघासंदर्भात विचारण्यात आला होता. दोन्ही प्रतिसादकांनी सर्व शाळांत शिक्षक पालक संघ कार्यान्वीत असल्याचे, त्यांच्या बैठका होत असल्याचे व त्यांच्या बैठकांची नोंद शाळा ठेवत असल्याचे सांगितले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

प्रश्न क्र. ७ हा शाळांना मिळणारे वेतनेतर अनुदान शाळा योग्य बाबींवर खर्च करतात का? असा विचारण्यात आला होता. दोन्ही प्रतिसादकांनी सर्व शाळा वेतनेतर अनुदान योग्य बाबींवर खर्च करत असल्याचे नमूद केले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

प्रश्न क्र. ८ शाळा न्यायाधिकरणाबाबत विचारण्यात आला होता. दोन्ही प्रतिसादकांनी

शाळा न्यायाधिकारण्याच्या प्रकरणात उपशिक्षणाधिकाऱ्यास पार्टी करत नसल्याचे नमूद केले, परंतू शाळा न्यायाधिकरणास आवश्यक असणारी सर्व माहिती मिळविण्याचे काम आपणांस करावे लागत असल्याचे सांगितले. अशा प्रकरणामुळे दैनंदिन कामाकाजावर परीणाम होतो, कामास विलंब होतो असे सांगितले. ही बाब संशोधकास गंभीर वाटली.

प्रश्न क्र. ९ हा शाळा न्यायाधिकरणाऐवजी शाळेतील कर्मचाऱ्यांच्या प्रकरणांचा निवाडा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे मार्फत व्हावा असे आपणांस वाटते काय? असा विचारण्यात आला होता. दोन्ही प्रतिसादकांनी शाळा न्यायाधिकरण हे स्वतंत्र असणे गरजेचे आहे असे सांगितले. सदरील माहिती वरून शाळा न्यायाधिकरण हे स्वतंत्र आहे हे योग्य आहे, असे संशोधकास वाटते.

प्रश्न क्र. १० हा विद्यार्थ्यांच्याबाबतीत शाळेत कोणकोणती अभिलेखे असावीत? असा विचारण्यात आला होता. प्रतिसादकांनी सांगितलेली अभिलेखे खालील प्रमाणे आहेत. कंसातील अंक प्रतिसादक संख्या (वारंवारीता) दर्शवितात .

१. आरोग्य तपासणी (०२)

२. दैनिक उपस्थिती (०२)

३. शालेय पोषण आहार (०२)

प्रश्न क्र. ११ हा जिल्हा पातळीवर माध्यमिक शिक्षण विभागामार्फता विद्यार्थ्यांसाठी कोणकोणत्या स्पर्धा/परीक्षा घेतल्या जातात? असा विचारण्यात आला होता. प्रतिसादकांनी दिलेली माहिती पुढील प्रमाणे आहे. कंसातील अंक प्रतिसादक संख्या (वारंवारीता) दर्शवितात.

१. एन. टी. एस. (०२)

२. चित्रकला (०२)

३. विज्ञान मेळावे / विज्ञान मंच (०२)

४. नवोदय विद्यालय परिक्षा (०२)

यावरून असे लक्षात येते की, लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणा विभागामार्फत विविध स्पर्धांचे व परीक्षांचे आयोजन केले जाते. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली.

प्रश्न क्र. १२ मुख्याध्यापकांच्या उद्‌बोधन वर्गाच्या आयोजनाविषयी विचारण्यात आला होता. दोन्ही प्रतिसादकांनी अशा उद्‌बोधन वर्गांचे आयोजन जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागामार्फत वेळोवेळी केले जात असल्याचे सांगितले. ही बाब संशोधकास समाधानाची वाटली. मुख्याध्यापकांचे वेळोवेळी उद्‌बोधन करणे गरजेचे आहे, कारण मुख्याध्यापक हा शालेय पातळीवरील प्रमुख प्रशासक असल्याने त्यांना प्रशासनाच्या नवनविन बाबींची माहिती होणे गरजेचे आहे. असे संशोधकास वाटते.

प्रश्न क्र. १३, माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या सेवांर्गत प्रशिक्षणाबाबत आपली कर्तव्ये कोणती? असा विचारण्यात आलेला होता. दोन्ही प्रतिसाकांनी नियमानुसार व सेवाजेष्ठतेनुसार अशा प्रशिक्षणार्थ्यांची निवड करणे व ती यादी वरीष्ठांकडे कार्यवाहीसाठी सादर करणे ही जबाबदारी उपशिक्षणाधिकाऱ्यांकडे असल्याचे नमूद केले.

प्रश्न क्र. १४, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर आपण कोणती कार्यवाही करता असा विचारण्यात आला होता. दोन्ही प्रतिसादकांनी आपण कोणतीही कार्यवाही करत नसून, अशा शाळा निदर्शनास आल्यास योग्य त्या कार्यावाहीसाठी वरीष्ठांकडे माहिती प्रस्तावित करत असल्याचे नमूद केले.

प्रश्न क्र. १५, विस्ताराधिकारी (माध्यमिक शिक्षण) यांना आपण कोणकोणते आदेश देता? असा विचारण्यात आला होता. दोन्ही प्रतिसादकांनी विशेष असे कोणतेही आदेश देत नसल्याचे व सर्वजन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या मार्गदर्शनांने काम करत असल्याचे सांगितले, परंतू शाळा तपासणीत विस्ताराधिकारी हे सोबत असतात असे सांगितले.

प्रश्न क्र. १६ हा लातूर जिल्हा परीषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या इतर समस्या आहेत काय? असा विचारण्यात आला होता. दोन्ही प्रतिसादकांनी याबाबत दिलेली माहिती खालील प्रमाणे आहे.

१. लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांची संख्या (४७४) लक्षात घेवून उपशिक्षणाधिकारी व शिक्षण विस्ताराधिकारी यांच्या संख्येत वाढ करणे गरजेचे आहे.
२. माध्यमिक शिक्षण विभागास स्वतंत्र बजेट नाही. ते प्राथमिक शिक्षण विभागाकडून घ्यावे लागते. त्याऐवजी माध्यमिक शिक्षण विभागास स्वतंत्र बजेट असावे.
३. माध्यमिक शिक्षण विभागात स्टेटचा स्टॉफ नसून तो जिल्हा परिषदेचा आहे.

त्याऐवजी नियमानुसार शिक्षण उपसंचालकाच्या अधिकारातील स्वतंत्र स्टॉफ किमान नॉन-सॅलरी व वैयक्तिक मान्यतेसाठी तरी असावा.

४. माहितीच्या अधिकाराचा गैर वापर होत असून अनेक जण या अधिकारातून माहिती मागतात. त्यामुळे दैनंदिन कामकाजावर त्याचा परिणाम होतो.

५. लातूर जिल्हा परिषदेच्या नाध्यमिक शिक्षण विभागास स्वतंत्र जागा नाही, स्वतंत्र इमारत नाही. त्यामुळे ते नेहमी स्थलांतरीत होत असते. त्यासाठी या विभागास स्वतंत्र जागा व इमारत असावी.

**५.१२ - शिक्षणाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती.**

संशोधकाने जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाचा प्रमुख या नात्याने लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी यांचेसाठी प्रश्नावली तयार केली. प्रश्नावलीत एकूण ९३ प्रश्नांचा समावेश होता. सदरील प्रश्नावली परिशिष्ट "फ" मध्ये देण्यात आलेली आहे व परिशिष्ट "ग" मध्ये अधिकाऱ्यांची नावे देण्यात आलेली आहेत. शिक्षणाधिकाऱ्यांच्या प्रश्नावलीतून मिळालेल्या माहितीचे विशदीकरण खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

१. लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणधिकाऱ्यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता बी.एस्सी., बी.एड्. आहे. त्यांना गटशिक्षणाधिकारी म्हणून १८ वर्षाचा अनुभव आहे. तर शिक्षणाधिकारी म्हणून १ वर्षाचा अनुभव आहे.

२. शिक्षणाधिकाऱ्यांच्या मते जिल्हा परिषदेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या नेमणूका जिल्हा परिषद करते.

३. संस्थेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक व मुख्यध्यापकांच्या नेमणूका संस्था करते.

४. जिल्हा परिषदेकडून चालविल्या जाणाऱ्या शाळांमध्ये शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या नेमणूका गरजेप्रमाणे व वेळेत होतात.

५. अशा नेमणूका गरजेप्रमाणे व वेळेत काही अंशी न झाल्यास त्याचा शाळांतर्गत प्रशासनावर अल्पांशाने परिणाम होतो.

६. मुख्याध्यापकांच्या नेमणूका खूप विलंबाने अथवा काहीशा विलंबाने होत असल्याने दैनंदिन शालेय व्यवस्थापन करण्याबाबत अडचणी निर्माण होतात.

७. शिक्षकांच्या नेमणूका गरजेप्रमाणे व वेळेत होत नसल्यास अध्यापन, विद्यार्थी उपस्थिती व इतर समस्या निर्माण होतात.

८. जिल्हा परिषदेमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांच्या बाबतीत शालेय व्यवस्थापन समितीवरील सदस्यांची निवड त्या त्या शाळांचे मुख्याध्यापक करतात.

९. शालेय व्यवस्थापन समितीवरील सदस्य काही अंशी शालेय जगाताचे ज्ञान व भान असलेले असतात.

१०. शाळा समितीच्या सदस्यांमध्ये काही अंशी एकवाक्यता असते.

११. माध्यमिक शाळा संहितेमध्ये नोंदवील्याप्रमाणे मुख्याध्यापकास व्यवस्थापनाचे स्वातंत्र्य काही अंशी मिळते.

१२. जिल्हा परिषद चालवत असलेल्या माध्यमिक शाळेत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका केल्यानंतर त्यांची पुन्हा वैयक्तिक मान्यता घ्यावी लागत नाही.

१३. स्वंयसेवी संस्थेने चालविलेल्या माध्यमिक शाळांमध्ये कर्मचाऱ्यांच्या नेमणूका केल्यानंतर त्यास शिक्षणधिकाऱ्याच्या मान्यतेची गरज असते.

१४. स्वंयसेवी संस्थेने नियुक्त केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मान्यता देण्यासाठी शिबिरांचे आयोजन केले जाते.

१५. अशा शिबिरांचे आयोजन गरजेनुसार व वरिष्ठांच्या परवागीने केले जाते.

१६. संबंधित कालावधीत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मान्यतेची संपूर्ण प्रकरणे निकाली काढली जातात.

१७. नेमणूका केल्यापासून मान्यता देण्यापर्यंत एक ते तीन महिन्याचा कालावधी लागतो.

१८. नियुक्त कर्मचाऱ्यांना मान्यता देत असताना जाहीरात, आरक्षण, नियुक्ती आदेश, ठराव, रूजू अहवाल, गरज, शैक्षणिक व व्यावसायिक कागद पत्रे, कोर्ट प्रकरणे, शाळेची सेवाजेष्ठता यादी इ. बाबी विचारात घेतल्या जातात.

१९. स्वंयसेवी संस्थाकडून होणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नेमणूकांबाबत

शासकीय नियम, कायदे याबाबतची माहिती व परिपत्रके मुख्याध्यापकांना काहीशा विलंबाने पण वेळोवेळी पुरविली जातात.

२०. स्वंयसेवी संस्थांनी केलेल्या कर्मचाऱ्यांच्या नेमणूका काही अंशी नियमाप्रमाणे असतात.

२१. योग्य नेमणूकाबाबत मार्गदर्शनासाठी मुख्याध्यापकांकरीता शासनाकडून उद्‌बोधन वर्ग घेतले जातात व त्याची गरज आहे.

२२. अशा उद्‌बोधन वर्गाचे समन्वयन जिल्हा परिषदेमार्फत केले जाते.

२३. कर्मचाऱ्यांच्या नेमणूका व त्यांच्या मान्यता याबाबतीत शासनाकडून धर सोडण्णा अथवा नियमात वारंवार बदल अशा बाबी घडतात. असे घडल्यास प्रशासकीय समस्या निर्माण होतात.

२४. स्वंयसेवी संस्थांनी केलेल्या कर्मचाऱ्यांच्या नेमणूका नियमानुसार नसतील तर प्रस्तावातील त्रूटींची पुर्तता करून कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीस मान्यता दिली जाते.

२५. शिक्षकांना व इतर कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देणे, वेतनवाढ रोखणे, कामवरून कमी करणे इ. अधिकार शिक्षणाधिकाऱ्यास नाहीत.

२६. कर्मचाऱ्यास कामावरून कमी केल्यास, पदावनत केल्यास, कामावरून बडतर्फ केल्यास, निलंबन केल्यास इ. बाबतीत शाळा न्यायाधिकरणास माहिती मागविण्याचे अधिकार आहेत.

२७. शाळा न्यायाधिकरण हे मंडळ स्वतंत्र आहे, हे योग्य आहे.

२८. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबाबत शाळा न्यायाधिकरणाकडे चालू असलेल्या प्रकरणांबाबत शिक्षणाधिकाऱ्यास पार्टी केले जाते.

२९. अशी पार्टी केल्यास शिक्षणाधिकाऱ्यास न्यायालयाकडून पाचारण केले जाते.

३०. याबाबत शिक्षणाधिकारी आपले म्हणणे न्यायालयात प्रतिनिधीमार्फत सादर करतात.

३१. सदरची माहिती मागविण्यासाठी शिक्षणाधिकारी संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, कार्यालयातील लिपिक, शिक्षण विस्ताराधिकारी यांची मदत घेतात.

३२. अशी माहिती वेळेवर उपलब्ध होते.

३३. उपलब्ध माहिती वस्तूनिष्ठ असल्याची पडताळणी केली जाते.

३४. सदरची माहिती न्यायालयात स्वतः हजर राहून सादर करणे बंधनकारक नाही.

३५. स्वयंसेवी संस्थानी आपल्या कर्मचाऱ्यांविरूध्द केलेल्या कार्यवाहीस शिक्षणाधिकारी यांची सहमती अथवा असहमती गरजेची आहे.

३६. स्वयंसेवी संस्थांनी आपल्या कर्मचाऱ्यास निलंबित केल्यास शिक्षणाधिकारी त्याबातीत निर्णय देवू शकतात.

३७. स्वयंसेवी संस्थेने आपल्या कर्मचाऱ्यास कामावरून कमी केल्यावरून प्रकरण न्यायप्रविष्ट असेल तर अशा कर्मचाऱ्याच्या जागी नविन नेमलेल्या कर्मचाऱ्यास न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून मान्यता देण्यात येते.

३८. शाळा न्यायधिकरणाने न्यायप्रविष्ट कर्मचाऱ्यास पुन्हा कामावर घेण्यासंबंधी हुकुम केल्यास दरम्यानच्या कालावधीचा त्याचा पगार संबंधित संस्थेला द्यावा लागतो.

३९. शाळा तपासणीचे उद्दिष्ट ठरवून दिलेले आहेत व ते पूर्ण होते.

४०. लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागात अपुरा कर्मचारीवर्ग असल्याने शाळा तपासणीस विलंब होतो.

४१. शाळा तपासणीत इमारत, फर्निचर, भौतिक सुविधा, शैक्षणिक कार्य, विद्यार्थी, शालेय अभिलेखे, विज्ञान साहित्य, ग्रंथालय, स्वच्छता गृह, उपस्थिती पट, इ. बाबींची तपासणी केली जाते.

४२. वार्षिक तपासणी खेरीज चौकशी प्रकरणे, तक्रारी, पटपडताळणी, शाळेचे इतर कार्यक्रम, परीक्षा, कोर्ट प्रकरणे इ. बाबतीत शाळांना भेटी द्याव्या लागतात.

४३. वर्षातून किमान दोन वेळा व गरजेनुसार जिल्ह्यातील मुख्याध्यापकांच्या तालुकानिहाय सहविचार सभा आयोजित केल्या जातात.

४४. नियमांचे उल्लंघन करण्याऱ्या शाळांचे अनुदान रोखण्याची कार्यवाही शिक्षणाधिकारी वरिष्ठांकडे प्रस्थावित करतात.

४५. शाळेस वेतन किंवा वेतनेतर अनुदान देण्याचे अधिकार शिक्षणाधिकाऱ्यांस नाहीत.

४६. कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी कर्मचारी वर्ग अपुरा आहे. त्यामुळे कामास विलंब होतो.

४७. जिल्हा परिषदेने अथवा स्वयंसेवी संस्थेन चालविलेल्या शाळांतील सर्व कर्मचाऱ्यांचे

वेतन वेळच्या वेळी दिले जाते.

४८. दीर्घ मुदतीच्या रजेच्या काळातील वेतन दोनदा दिले जाण्याची समस्या आहे.

४९. कर्मचाऱ्यांच्या नेमणूका व वेतन या बाबी वेगवेगळ्या पथकांकडे आहेत.

५०. दोन्ही पथकांचे प्रमुख शिक्षणाधिकारी (मा.) हेच असतात.

५१. विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सर्व शिष्यवृत्त्या वेळेवर दिल्या जातात.

५२. शाळा इमारतीचे भाडे संबंधित मालकाला वेळेवर दिले जाते.

५३. शाळेच्या इमारतीची भाडे निश्चिती बांधकाम विभागाच्या अभियंत्याकडून केली जाते.

५४. शाळेच्या इमारतीची भाडे जिल्हा परिषदेच्या शिक्षण खात्यामार्फत दिले जाते.

५५. जिल्हा परिषदेच्या शाळा व स्वयंसेवी संस्थांच्या शाळा यांच्या सुट्ट्यांच्या संख्येत फरक नसतो. सर्व सुट्ट्या शासनाने ठरवलेल्या असतात.

५६. ठरवून दिलेल्या सुट्ट्यांशिवाय आयत्यावेळी जाहीर केलेल्या सुट्ट्यांच्या अमंलबजावणीबाबत कोणतीही समस्या निर्माण होत नाही.

५७. सुट्ट्यांची संख्या कायम ठेवून त्यात अदलाबदल करून सुट्टी देण्याचे अधिकार मुख्याध्यापकांना आहेत.

५८. नविन शाळा मान्यता संदर्भात आलेला प्रस्ताव वरिष्ठांकडे प्रस्तावित केला जातो.

५९. मान्यताप्राप्त परंतू विना-अनुदानीत शाळांच्या बाबतीत शिक्षणाधिकाऱ्यांचे खालील कामे आहेत.

अ) वार्षिक तपासणी करणे.

ब) वेळोवेळी तपासणी करणे.

क) शालेय इमारत व परीसर यांचे औचित्य ठरविणे.

ड) विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या निरनिराळ्या शिष्यवृत्त्या व सुविधा दिल्या जातात की नाही याची पाहणी करणे.

इ) कर्मचाऱ्यांच्या नेमणूकांना मान्यता देणे.

६०. जिल्हा परिषद प्रशासनाची अनुदानीत शाळांबाबत असणारी सर्व कर्तव्ये व अधिकार विना-अनुदानीत शाळांबाबत देखील आहेत.

६१. जिल्हा परिषद प्रशासनाची मराठी माध्यमाच्या शाळांबाबत असणारी सर्व कर्तव्ये

व अधिकार इंग्रजी माध्यमाच्या शाळांबाबत देखील आहेत.

६२. शिक्षणाधिकाऱ्यांना सेवांर्गत प्रशिक्षण दिले जाते.

६३. शिक्षणाधिकाऱ्यांना करावी लागणारी विहित, योग्य व कायदेशीर कामे बेकायदेशीर करण्याबाबत राजकीय दबाव येतो. अशा दबावाचा त्यांच्या मानसिकतेवर कोणताही परिणाम होत नाही.

६४. उच्च माध्यमिक वर्गांचे प्रशासन जिल्हा परिषद पातळीवर स्वतंत्र असणे गरजेचे आहे.

६५. जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी माध्यमिक यांना असणारा कार्यभार योग्य व पुरेसा आहे.

## ५.१३ - माध्यमिक शाळांना दिलेल्या भेटी व निरीक्षणातून मिळालेल्या माहितीचे विशदीकरण.

संशोधकाने संशोधनाच्या दृष्टिने वस्तूनिष्ठ माहिती मिळविण्यासाठी लातूर जिल्ह्यातील २५ माध्यमिक शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. मुख्याध्यापकांकडून मिळालेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी संशोधकाला या भेटीचा उपयोग झाला. मुख्याध्यापकांच्या प्रश्नावलीतील माहिती व्यतिरिक्त बऱ्याच बाबी भेटी व निरीक्षणातून संशोधकाच्या लक्षात आल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

**अ) माध्यमिक शाळांच्या इमारती व इतर भौतिक सोयी -**

१. ५० % माध्यमिक शाळांच्या इमारती या कच्च्या स्वरूपाच्या आहेत. तर ५० % माध्यमिक शाळांच्या इमारती पक्क्या आहेत.

२. शहरातील जवळपास सर्व शाळा गजबजलेल्या परीसरात आहेत. तर ग्रामीण भागातील ८० % शाळा या गावापासून दूर व प्रशस्त वातावरणात आहेत.

३. ८० % शाळांना पुरेशा वर्ग खोल्या आहेत.

४. सर्व शाळेत पिण्याची पाण्याची सोय केली आहे.

५. ग्रामीण भागातील ८० % शाळांना कंपांउड नाही.

६. ९० % शाळांत शिक्षक व मुख्याध्यापक यांच्यासाठी स्वतंत्र कक्षाची सोय आहे.

७. ४० % शाळांत ग्रंथालय स्वतंत्र आहे.

ब) वर्गखोल्यांच्या निरीक्षणातून मिळालेली माहिती -

१. ९० % शाळांमध्ये पुरेसे फर्निचर उपलब्ध आहे.

२. ९५ % शाळांत वर्गखोल्यांना स्वच्छ सूर्यप्रकाश व हवेसाठी खिडक्यांची सोय केली आहे.

३. ४० % माध्यमिक शाळांच्या वर्गखोल्या स्वच्छ होत्या.

४. ४० % माध्यमिक शाळांच्या भिंती बोलक्या होत्या. तेथे तक्ते, नकाशे, विज्ञान व गणिताची सूत्रे इ. वर्ग सजावट दिसून आली.

५. ७० % शाळांना खेळासाठी क्रीडांगण पुरेसे असल्याचे दिसले.

६. ३० % शाळांमध्ये बाग-बगीचे असल्याचे दिसून आले.

७. ८० % शाळांच्या विद्यार्थ्यांमध्ये शिस्त असल्याचे दिसून आले.

८. ६० % शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी गणवेश असल्याचे दिसून आले.

९. ६० % शाळांमध्ये टेलिफोनची सोय असल्याचे दिसून आले.

**५.१४ समारोप.**

मुख्याध्यापकांची प्रश्नावली, शिक्षण विस्तारांधिऱ्यांची प्रश्नावली, शिक्षणाधिकाऱ्यांची प्रश्नावली, उपशिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखती व संशोधकाने निवडक शाळांना दिलेल्या प्रत्यक्ष भेटी त्यातून माध्यमिक शाळांची केलेली निरीक्षणे याद्वारे मिळालेल्या माहितीचे विशदीकरण प्रस्तुत प्रकरणात केलेले आहे. संशोधकाने जिल्ह्यातील प्रतिसादक म्हणून निवडलेल्या सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या प्रतिसादामुळे मुख्याध्यापकांनी दिलेली माहिती विश्वसनीय आहे, असे संशोधकास वाटते. त्याचबरोबर संशोधकांने निवडक शाळांना दिलेल्या भेटी व केलेल्या प्रत्यक्ष निरीक्षणातून मिळालेल्या प्रतिसादावरून प्रतिसादक शासकीय अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती संशोधकास सत्य वाटते. या प्राप्त माहितीवर आधारीत पुढील प्रकरणात संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी दिलेल्या आहेत.

शेवटी पुढील संशोधनासाठीच्या विषयांची यादी दिलेली आहे.